# मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीची २३९ वी बैठक

**दिनांक :** **२९ ऑक्टोबर, २०१३ (मंगळवार)**

**वेळ :** **दुपारी १२.०० वाजता**

**स्थळ :** **मुख्य सचिव यांचे समिती कक्ष,**
**सहावा मजला, मंत्रालय**
**मुंबई - ४०० ०३२.**

**उपस्थित सदस्य :**

| | | |
|---|---|---|
| श्री. जयन्त कुमार बाँठिया<br>मुख्य सचिव,<br>महाराष्ट्र शासन | - | अध्यक्ष |
| श्री. द.म.सुकथनकर | - | सदस्य |
| श्री. ना.वि.मिराणी | - | सदस्य |
| श्री. मनुकुमार श्रीवास्तव<br>प्रधान सचिव (१),<br>नगर विकास विभाग | - | सदस्य |
| श्री. देबाशिष चक्रबर्ती<br>प्रधान सचिव,<br>गृहनिर्माण विभाग | - | सदस्य |
| श्री. सिताराम कुंटे<br>महापालिका आयुक्त,<br>बृहन्मुंबई महानगरपालिका | - | सदस्य |
| श्री. संजय भाटिया<br>व्यवस्थापकीय संचालक,<br>सिडको | - | सदस्य |
| श्री. यु.पी.एस. मदान<br>महानगर आयुक्त,<br>मुं.म.प्र.वि.प्राधिकरण | - | सदस्य |

**निमंत्रित :**

श्री. श्रीकांत सिंह
प्रधान सचिव (२),
नगर विकास विभाग व
प्रधान सचिव (विशेष प्रकल्प) (अति.कार्यभार),
सामान्य प्रशासन विभाग

श्री. आर. ए. राजीव
प्रधान सचिव,
पर्यावरण विभाग

श्रीमती वल्सा नायर सिंह
अति.महानगर आयुक्त (१)/प्रकल्प संचालक,
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्रीमती अश्विनी भिडे
अति.महानगर आयुक्त (२),
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्रीमती उमा अडुसुमिली
प्रमुख, नियोजन विभाग,
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री. संपतकुमार
प्रमुख, नगर व क्षेत्र नियोजन विभाग,
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री. वि. ग. पाटील
प्रमुख, सामाजिक विकास कक्ष,
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री. श. म. सबनीस
मुख्य अभियंता, अभियांत्रिकी विभाग,
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री. स. भ. तामसेकर
मुख्य अभियंता, अभियांत्रिकी विभाग,
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री. आर. रमण्णा
प्रमुख (अतिरिक्त कार्यभार)
परिवहन व दळणवळण विभाग,
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री. रा. म. गोटाफोडे
मुख्य लेखाधिकारी, वित्त व लेखा विभाग,
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री. अ. रा. वानखेडे
उप महानगर आयुक्त (भूमी / मिळकत)
भूमी शाखा, मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री. दि. न. कवठकर
सह प्रकल्प संचालक (जनसंपर्क) आणि
उप महानगर आयुक्त (प्रशासन) (अति.कार्यभार),
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री. उ. गं. भार्गव
सचिव, कार्यकारी समिती (अति.कार्यभार),
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

बैठकीच्या सुरुवातीस, प्राधिकरणाच्या वतीने मा. मुख्य सचिव व अध्यक्ष, कार्यकारी समिती यांचे महानगर आयुक्त यांनी स्वागत केले.

त्यानंतर, मा. मुख्य सचिव व अध्यक्ष, कार्यकारी समिती यांनी सर्व उपस्थित सदस्यांचे स्वागत केले.

त्यानंतर, विषय पत्रिकेवरील बाबी विचारात घेण्यात आल्या.

**बाब क्र.१ : प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीच्या दिनांक ०४ मे, २०१३ रोजी झालेल्या २३८व्या बैठकीचे कार्यवृत्त कायम करणे.**

कार्यवृत्त कायम करताना खालीलप्रमाणे चर्चा करण्यात आली :-

कार्यकारी समितीच्या २३८व्या बैठकीच्या कार्यवृत्तावर सुधारणा करण्यासंबंधी कार्यकारी समितीचे सदस्य श्री. ना. वि. मिराणी यांचेकडून प्राप्त झालेल्या पत्राबाबत चर्चा झाली व त्यानुसार कार्यवृत्ताच्या शेवटी मा.अध्यक्षांच्या परवानगीने येणारे इतर विषय यामध्ये खालील परिच्छेद अंतर्भूत करुन सुधारणा करण्यात येत आहे.

> श्री. ना. वि. मिराणी, सदस्य, कार्यकारी समिती यांनी मा. मुख्य सचिव व अध्यक्ष कार्यकारी समिती हयांना अशी विनंती केली की, कार्यकारी समितीच्या कामकाजासंबंधीत बाब ही ब-याच दिवसापासून प्रलंबित असल्याने ती विचारार्थ घेण्यात यावी. त्यानुसार, मा. मुख्य सचिव व अध्यक्ष कार्यकारी समिती यांनी सदर बाब टिप्पणी कार्यकारी समितीच्या आगामी बैठकीत सादर करण्यात यावी असे महानगर आयुक्तांना निर्देश दिले.

त्यानंतर, वरील सुधारणेसह बैठकीचे कार्यवृत्त कायम करण्यात आले.

**बाब क्र.२ : प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीच्या दिनांक ०४ मे, २०१३ रोजी झालेल्या २३८व्या बैठकीच्या कार्यवृत्तावरील कार्यवाही अहवाल.**

कार्यकारी समितीच्या दिनांक ०४ मे, २०१३ रोजी झालेल्या २३८व्या बैठकीच्या कार्यवृत्तावरील कार्यवाही अहवालावर चर्चा करताना खालील विषयावर चर्चा करण्यात आली :-

**बाब क्र.३ :- मुंबई महानगर प्रदेशात नागरी घनकच-यावर शास्त्रोक्त पध्दतीने प्रक्रिया व प्रक्रियेतून उर्वरित कच-याची भरावभूमीमध्ये विल्हेवाट लावण्यासाठी तळोजा येथील प्रकल्पासाठी प्रर्वतकाची नेमणूक.**

या विषयावर चर्चा करताना महानगर आयुक्त यांनी बाब क्र.३ मधील मुद्दा क्र.३ बाबत स्थानिक स्वराज्य संस्थांना या प्रकल्पात कशाप्रकारे सहभागी करुन घेता येईल याबाबत नगर विकास विभागाने त्वरीत कार्यवाही करावी असे सांगितले. कार्यकारी समितीचे निमंत्रित सदस्य श्री. श्रीकांत सिंह, प्रधान सचिव (२) नगर विकास विभाग यांनी

असे सुचित केले की, तळोजा येथील सामाईक भराव भुमी प्रकल्पात सहभागी होणाऱ्या ६ महानगरपालिका/नगरपरिषदांना महाराष्ट्र नगर पालिका व नगरपरिषद (तिसरी सुधारणा) अधिनियम, २०१२ नुसार सहभागी होणे बंधनकारक करण्यास नगर विकास विभागाकडून निर्देश देण्याबाबतची कार्यवाही करण्यात येत आहे.

मुद्दा क्र. ५ बाबतीत महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, ठाणे महानगरपालिकेने आपली निविदा उघडली असल्याने त्यांनी तळोजा प्रकल्पात सहभागी होणार किंवा कसे याबाबतचा निर्णय अद्यापपर्यंत कळविलेला नाही. परंतु ठाणे महानगरपालिकेने प्रतिसाद देणे अपेक्षित आहे. त्यांचेकडून प्राप्त अभिप्रायानुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल.

मुद्दा क्र. ६ बाबत अति.महानगर आयुक्त (२) यांनी असे सांगितले की, ठाणे महानगरपालिकेने सहभाग काढून घेतल्यास नवी मुंबई महानगरपालिका, सिडको यांना सहभागी करुन घेण्याबाबत त्यांचे समवेत चर्चा करण्यात येवून सहमती कळवावी अशी विनंती केली होती त्यासअनूसरुन सिडकोने तत्वतः सहमती दर्शविली असून त्यांना "टिपिंग फी" दराबाबत व प्रकल्पाबाबत अन्य माहितीची मान्यता प्राप्त करण्यासाठी दिनांक २६ जुलै, २०१३ च्या पत्राव्दारे उपलब्ध करण्यात आलेली आहे. तसेच नवी मुंबई महानगरपालिकेकडून उत्तर अद्याप अप्राप्त आहेत. त्यापुढे अति.महानगर आयुक्त (२) यांनी असेही सांगितले की, मिरा भाईंदर महानगरपालिकेने अंशतः म्हणजे २०० मे.टन प्रतिदिन घनकचरा तळोजा प्रकल्पासाठी उपलब्ध करण्यात येईल असे कळविले आहे व प्रकल्पात सहभागी होण्याची तयारी दर्शविली आहे. दिनांक २० ऑगस्ट, २०१३ रोजी मा. उप मुख्यमंत्र्यांच्या समवेत झालेल्या बैठकीत हा विषय चर्चेत आला असता मिरा भाईंदर महानगरपालिकेस "टिपिंग फी" इतर स्थानिक स्वराज्य संस्थाप्रमाणे द्यावी लागेल परंतु तळोजा प्रकल्प मिरा भाईंदर महानगरपालिकेपासून अंदाजे ५० कि.मी. दूर असल्याने व प्रकल्पात सरासरी २५ कि.मी.पर्यंतचा खर्च प्रवर्तकाने करावयाचा असल्याने २५ कि.मी.पेक्षा जास्त अंतराचा खर्च प्राधिकरणाने करावा असा निर्णय घेण्यात आला आहे. मिरा भाईंदर महानगरपालिकेसमवेत सविस्तर चर्चा करुन पुढील कार्यवाही करण्यात येईल.

महानगर आयुक्त यांनी असे विषद केले की, प्राधिकरणाने प्रवर्तकास दिनांक ५ जुलै, २०१३ रोजी कार्यादेश दिल्यानंतर त्यांचेसमवेत "सवलत-करारनामा" करण्याची कार्यवाही सुरु केली. निविदेतील अटीनुसार, प्रवर्तकाकडून SPV कंपनी नोंदणीची प्रक्रिया करण्यात येत असून, SPV कंपनीसमवेत "सवलत-करारनामा" लवकरच करण्यात येणार आहे. त्यानंतर प्रकल्प उभारण्याबाबतच्या अनुषांगीक बाबी पूर्ण करुन प्रकल्पाच्या अमंलबजावणीबाबतची कार्यवाही करण्यात येईल.

त्यानंतर, कार्यवाही अहवालाची नोंद कार्यकारी समितीने घेतली.

**बाब क्र.३ : शिळफाटा कल्याण व मुंब्रा जंक्शन येथील प्रस्तावित उड्डाणपूलांच्या बांधकामाकरिता प्रकल्प व्यवस्थापन व संकल्पचित्र पडताळणी व मुंब्रा पर्यायी मार्ग जंक्शन करिता प्रकल्प व्यवस्थापन सल्लागाराची नेमणूक करणे.**

३.१ या प्रस्तावाबाबत माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, विस्तारीत मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पांतर्गत शिळफाटा कल्याण व मुंब्रा जंक्शन येथील प्रस्तावित उड्डाणपूलांच्या बांधकामाकरिता प्रकल्प व्यवस्थापन व संकल्पचित्र पडताळणी व मुंब्रा पर्यायी मार्ग जंक्शन करीता प्रकल्प व्यवस्थापन सल्लागाराची नेमणूक करण्याकरिता इच्छुक प्रकल्प व्यवस्थापन व संकल्पचित्र पडताळणी करण्याकरिता विनंती प्रस्ताव दिनांक १३ मार्च, २०१३ रोजी वर्तमानपत्रामध्ये जाहिरात देऊन मागविण्यात आला. त्यास अनुसरुन एकूण ५ सल्लागारांचे प्रस्ताव प्राप्त झाले होते.

३.२ त्यानंतर, महानगर आयुक्त यांनी असेही सांगितले की, प्राप्त झालेल्या प्रस्तावाचे तांत्रिक व वित्तीय मुल्यमापन करण्याकरिता मुख्य अभियंता यांच्या मान्यतेने मुल्यमापन समिती गठीत करण्यात आली. प्राप्त झालेले सर्व ५ विनंती प्रस्ताव निविदा सूचनेतील पूर्व अर्हता निकषानुसार तपासण्यात आले. त्यामध्ये मे.शिरिष पटेल अँन्ड असोशिएटस् यांनी प्रस्ताव सुचनेतील पूर्व अर्हता अट पूर्ण करीत नसल्याने अवैध ठरविण्यात आले.

३.३ कार्यकारी समितीचे सदस्य सर्वश्री ना. वि. मिराणी व द. म. सुकथनकर यांनी असे सुचविले की, मे.शिरिष पटेल अँन्ड असोशिएटस् यांना अशा प्रकारच्या कामांचा सखोल अनुभव असल्यामुळे त्यांची नियुक्ती त्रिपक्षीय दर्जा परिक्षक म्हणून (Third Party Quality Audit) करण्याबाबत विचार करावा.

३.४ चर्चेच्या दरम्यान कार्यकारी समितीचे निमंत्रित सदस्य श्री. आर. ए. राजीव, प्रधान सचिव, पर्यावरण विभाग यांनी अशी सुचना केली की, शिळफाटा कल्याण व मुंब्रा बायपास जंक्शन पर्यंत एकत्रित उड्डाणपूल बांधण्यासाठीच्या प्रस्तावाचा अभ्यास करण्यात यावा. सदर बाबी संदर्भात महानगर आयुक्त, यांनी अभ्यास करण्यात येईल असे सांगितले.

३.५ मुख्य सचिव व अध्यक्ष, कार्यकारी समिती यांनी विचारणा केली की, मे.स्टुप कन्संल्टट प्रा.लि. यांनी प्रकल्पावर नेमण्यात येणा-या Key Personnel बाबतची माहिती निविदांसोबत सादर केली आहे का? यावर, महानगर आयुक्त यांनी असा खुलासा केला की, सदर कामाच्या निविदा संख्या बाब टिप्पणी सोबत जोडलेल्या जोडपत्र-१ मध्ये Key Personnel बाबतची माहिती देण्यात आलेली आहे.

मा. मुख्य सचिव व अध्यक्ष , कार्यकारी समिती यांनी पुढे अशीही विचारणा केली की, नेमलेल्या Key Personnel बाबतची शहानिशा कश्या प्रकारे केली जाणार आहे, तसेच त्यांचे वेतन कशाप्रकारे दिले जाणार आहे? याबाबत महानगर आयुक्त यांनी असे स्पष्टीकरण दिले की, सदर Key Personnel वर अभियंत्यांचे नियंत्रण राहील तसेच त्यांचे वेतन प्रत्याक्षात नेमणूक केलेल्या Key Personnel वर अवलंबून राहील. Key Personnel च्या नेमणूका रद्द करणे किंवा त्याऐवजी दुस-या Key Personnel यांची नियुक्ती करण्याच्या अधिकाराबाबत निविदा संचात तरतूद केलेली आहे. प्राधिकरणाच्या पूर्वपरवानगी शिवाय Key Personnel मध्ये बदल करता येणार नाही अशी तरतूद निविदेत आहे.

३.६ त्यानंतर, महानगर आयुक्त यांनी पुढे असेही सांगितले की, सदरच्या चारही वैध ठरलेल्या सल्लागारांचे तांत्रिक व वित्तीय मूल्यमापन करण्यात आले. विनंती प्रस्तावाच्या अन्वये जो सल्लागार संयुक्तिक, तांत्रिक व वित्तीय निकषात जास्त गुण संपादन केलेले आहे, अश्या सल्लागारास प्रकल्पासाठी सल्लागार म्हणून नेमण्यात येईल असे नमूद करण्यात आले आहे. मे.स्टूप कन्सल्टंट प्रा.लि. यांनी संयुक्तिक, तांत्रिक व वित्तीय निकषात जास्त गुण प्राप्त केल्यामुळे निविदाकाराने देऊ केलेला देकार हा वाजवी व योग्य असल्याने मान्य करण्याची विनंती आहे.

३.७ मा. मुख्य सचिव व अध्यक्ष कार्यकारी समिती यांनी असे सांगितले की, प्रकल्प व्यवस्थापन सल्लागाराच्या नेमणूकी संदर्भात कार्यकारी समितीच्या बैठकीमध्ये बाब टिप्पणी सादर करताना संबंधित सल्लागार हा त्या क्षेत्रात निष्णांत असल्याबाबतची पार्श्वभूमी तपासून माहिती सादर करण्यात यावी. यासंदर्भात महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, प्रकल्प व्यवस्थापन सल्लागाराची नियुक्ती करताना त्यांच्या पार्श्वभूमीची माहिती बाब टिप्पणीमध्ये समाविष्ट करण्यात येईल.

३.८ त्यानंतर, बाब टिप्पणीतील प्रस्तावास मान्यता देऊन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :-

**ठराव क्र. १२३४ :**

**“असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ७ चे उपकलम (३) चे पोटकलम (तीन) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन कार्यकारी समिती याव्दारे शिळफाटा कल्याण व मुंब्रा जंक्शन येथील प्रस्तावित उड्डाणपूलांच्या बांधकामाकरिता प्रकल्प

..७/-

व्यवस्थापन व संकल्पचित्र पडताळणी व मुंब्रा पर्यायी मार्ग जंक्शन करिता प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणून मे.स्टुप कन्सल्टंट प्रा.लि. यांची रु.२,७०,००,०००/- अधिक सेवा कर (Service Tax) इतक्या शुल्कावर नियुक्ती करण्यास मान्यता देत आहे.

**"असाही ठराव करण्यात येत आहे की,** वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबंधी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याव्दारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**बाब क्र.४ : नायगाव - जुचंद्र - बापाणे राज्य मार्ग क्र.४१ ची राष्ट्रीय महामार्ग क्र.८ पासून नायगाव रेल्वे स्टेशनपर्यंत सुधारणा करणे व नायगाव रेल्वेस्टेशन येथे रेल्वेउड्डाणपूल व खाडीवरील पूल जोडरस्त्यासह बांधणे.**

४.१ या प्रस्तावाबाबत महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, नायगाव-जुचंद्र-बापाणे राज्य मार्ग क्र.१ ची राष्ट्रीय महामार्ग क्र.८ पासून नायगाव रेल्वे स्टेशनपर्यंत सुधारणा करणे व नायगाव रेल्वेस्टेशन येथे रेल्वे उड्डाणपूल व खाडीवरील पूल जोडरस्त्यासह बांधणेच्या कामाची आवश्यकता व निकड याची सविस्तर माहिती कार्यकारी समितीस सादर केली. नायगाव-जुचंद्र-बापाणे राज्य मार्ग क्र.१ची राष्ट्रीय महामार्ग क्र.८ पासून नायगाव रेल्वे स्टेशनपर्यंत सुधारणा करणे व नायगाव रेल्वेस्टेशन येथे रेल्वे उड्डाणपूल व खाडीवरील पूल जोडरस्त्यासह बांधणे या कामास मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीच्या दिनांक २८ जानेवारी, २०१३ रोजी झालेल्या २३७व्या बैठकीत ठराव क्र.१२२१ अन्वये रु. १०७.५० कोटी अंदाजित खर्चास सुधारित प्रशासकिय मान्यता प्रदान करण्यात आली आहे. त्यानुसार प्रस्तावित प्रकल्पाकरिता समंत्रकाची नेमणूक करण्यात आली होती. प्रस्तावित प्रकल्पाचे समंत्रक मे. आरटीफेक्ट लि. यांनी दिलेल्या अहवालानुसार प्रस्तावित नायगाव रेल्वेस्टेशन येथे रेल्वेउड्डाणपूल व खाडीवरील पूलाची आखणी CRZ नियमावलीमुळे बाधीत होती. राज्य शासनाच्या पर्यावरण विभागाकडून (MCZMA) या प्रकल्पास दिनांक ०२ जुलै, २०१२ रोजी ना-हरकत पत्र प्राप्त झाले आहे. या मार्गात मॅनग्रोव्ह (तिवरांची झाडे) तसेच अन्यप्रकारची झाडे, झुडपे येत आहेत. रेल्वेउड्डाणपूलाच्या आखणीचा काही भाग मिठागरांच्या जमिनीतून जात असल्याने त्यांची भूसंपादन प्रक्रिया प्रगतीपथावर आहे.

४.२ महानगर आयुक्त यांनी असेही सांगितले की, नियोजित रेल्वेउड्डाणपुलामुळे वसईच्या पश्चिमेकडील रहिवाशांना वाहतुकीस मोठा फायदा होणार असून वसई (पश्चिम) ते मुंबई हे अंतर सुमारे १० कि. मी. ने इतके कमी होणार आहे. त्यामुळे वेळेची व इंधनाची बचत होणार आहे. यास्तव नियोजित कामाबाबत विधानसभेतील सदस्यांकडून सातत्याने पाठपुरावा करण्यात येत असून

..८/-

या विषयावर तारांकित व अतारांकित प्रश्न विधानसभेत सातत्याने विचारण्यात आले आहेत. यापैकी अतारांकित प्रश्न क्र. ७९४३५ च्या उत्तराच्या चर्चेत मा. मुख्यमंत्री यांनी दिनांक १२ जुलै, २०१२ रोजी विधानसभेत प्रस्तावित काम सहा महिन्याच्या कालावधी / जमिनीचा ताबा प्राप्त होताच सुरु करण्यात येईल असे आश्वासन दिले आहे. त्यानुसार या कामाची अत्यंत निकड लक्षात घेता व स्थानिक प्रतिनिधींचा या बाबतचा पाठपुरावा विचारात घेऊन सदर कामाच्या निविदापूर्व बाबींची पूर्तता करुन कामाच्या निविदा मागविण्यात आल्या. निविदा सुचनेस प्रतिसाद देऊन ११ निविदाकारांनी विहीत कालावधीमध्ये निविदा खरेदी केल्या. त्यानुसार सिम्पलेक्स इन्फ्रास्ट्रक्चर लि. यांचा देकार सर्वात लघुत्तम असून अंदाजपत्रकीय किंमतीपेक्षा २६.९६% अधिक आढळला आहे. सिम्पलेक्स इन्फ्रास्ट्रक्चर लि. यांच्या अंदाजित रक्कमेपेक्षा अधिक निविदेस निविदा समितीने त्यांच्या दिनांक ११ ऑगस्ट, २०१३ रोजीच्या बैठकीत मंजूरी दिली आहे.

४.३ सदर कामाचे अंदाजपत्रक कोणत्या वर्षीच्या जिल्हा दर सूचीवर तयार करण्यात आले आहे याची विचारणा कार्यकारी समितीचे सदस्य श्री. ना. वि.मिराणी, यांनी केली असता मुख्य अभियंता यांनी कामाचे अंदाजपत्रक सन २०११-१२ वर्षीच्या जिल्हा दर सूचीनुसार तयार करण्यात आल्याचे स्पष्ट केले. तसेच सन २०१२-१३ च्या दरसूचीमुळे कामाच्या अंदाजित रक्कमेत ८.३३ कोटी म्हणजेच ७.७९% वाढ झाल्याचे स्पष्ट केले. कामाच्या निविदेबाबतच्या चर्चे दरम्यान कार्यकारी समितीचे सदस्य श्री. संजय भाटीया, व्यवस्थापकीय संचालक, सिडको यांनी सिडकोकडे प्राप्त होणारे पुलांचे व उड्डाणपुलांचे देकारदेखिल अंदाजीत रक्कमेपेक्षा जास्त असल्याचे सांगितले.

४.४ कार्यकारी समितीचे निमंत्रित सदस्य श्री. श्रीकांत सिंह, प्रधान सचिव (२), नगर विकास विभाग यांनी सदर प्रस्तावात दर्शविण्यात आलेले दर जिल्हा दर सूचीप्रमाणे असल्यास निविदा मंजूर करण्यास हरकत नसावी.

४.५ त्यानंतर, बाब टिप्पणीतील प्रस्तावास मान्यता देऊन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :-

**ठराव क्र. १२३५ :**

"**असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ७ चे उपकलम (३) चे पोटकलम (तीन) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन कार्यकारी समिती याव्दारे विस्तारीत मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पांतर्गत, वरील सर्व बाबींचे अवलोकन करता विस्तारीत मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पांतर्गत पुढील प्रस्तावास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

नायगाव-जुचंद्र-बापाणे राज्य मार्ग क्र.४१ ची राष्ट्रीय महामार्ग क्र.८ पासून नायगाव रेल्वे स्टेशनपर्यंत सुधारणा करणे या टक्केवारी दराच्या कामाची रु.२३,०५,७५,४२४/- म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा २०.४६% जास्त व नायगाव रेल्वे स्टेशन येथे रेल्वे उड्डाणपूल व खाडीवरील पूल जोडरस्त्यासह बांधणे या ठोस रक्कमी दराच्या कामाची रु.८५,००,१३,५८०/- म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा २८.८३% जास्त, सिमप्लेक्स इन्फ्रास्ट्रक्चर लि. यांची टक्केवारी दराची व ठोस रक्कमी दराच्या एकूण रु.१०८,०५,८९,००४/- रक्कमेची लघुत्तम निविदा (अंदाजपत्रकीय दरापेक्षा २६.९६% जास्त दराने) स्विकारण्यास मान्यता देत आहे.

नायगाव-जुचंद्र-बापाणे राज्य मार्ग क्र.४१ ची सुधारणा करणे या कामाच्या रु.१२५.६४ कोटी सुधारीत किंमतीस प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**"असाही ठराव करण्यात येत आहे की,** या अनुषंगाने करण्यात येणा-या करारनाम्यातील अटींप्रमाणे देय होणा-या संभाव्य आर्थिक बदलासह अधिदान करण्यास मान्यता देत आहे.

**"आणखी असा ठराव करण्यात येत आहे की,** वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबंधी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**बाब क्र.५ : वांद्रे-कुर्ला संकुलातील मिठी नदीच्या पात्राची रुंदी व खोली वाढविणे, तसेच मिठी नदीच्या परिसराचा विकास करणे, संरक्षक भिंती व सेवा रस्ते बांधणे, यासाठी टप्पा-२ मधील कामासाठी नियुक्त केलेल्या मे. टाटा कन्सल्टींग इंजिनिअर्स लिमिटेड या प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार संथेच्या वाढीव फी चा सुधारित प्रस्ताव मंजूर करणे.**

५.१ या प्रस्तावाबाबत माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, वांद्रे कुर्ला संकुलातील मिठी नदीच्या पात्राची रुंदी व खोली वाढविणे तसेच मिठी नदीच्या परिसराचा विकास करणे यासाठी टप्पा-१ व टप्पा-२ मधील कामांची देखरेख करणे, कामांची मोजमापे घेण्याच्या पध्दती निश्चित करणे, झालेल्या कामांची मोजमापे घेवून कंत्राटदारांची देयके अदा करण्याची शिफारस करणे या करिता प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणून मे.टाटा कन्सल्टींग इंजिनिअर्स लिमिटेड या सल्लागार संस्थेची एकमेव स्त्रोत या तत्वावर नेमणूक करण्यास रु.१९७.३२ लक्ष इतक्या रक्कमेच्या फीसाठी कार्यकारी समितीने दिनांक १७ मे, २००६ रोजी झालेल्या २१६व्या बैठकीत मान्यता दिली आहे. त्यानंतर दिनांक १३ सप्टेंबर, २००७ रोजी झालेल्या कार्यकारी समितीच्या २२०व्या बैठकीत रु.६०५.४४ लक्ष एवढया रकमेच्या एकूण फीसाठी मान्यता दिली आहे.

५.२ त्यानंतर महानगर आयुक्त यांनी असेही सांगितले की, मे.टाटा कन्सल्टींग इंजिनिअर्स लिमिटेड यांच्या फी वाढीचा प्रस्ताव कार्यकारी समितीसमोर सादर करण्यात आला. ही वाढ मुख्यत्वे खालील बाबींमुळे झाल्याचे स्पष्ट करण्यात आले:-

अ) तक्रार निवारण समितीच्या बैठक व इतर कामांकरीता अधिक लागलेले मनुष्यबळ - रु.१५.०० लक्ष

ब) २ वर्षाच्या पावसाळापूर्व गाळ काढण्याच्या कामाची देखरेख व सुनियंत्रण करण्यासाठी लागलेले मनुष्यबळ - रु.९१.०० लक्ष

क) १०% अधिक दराने भाववाढ - रु. १८.०० लक्ष

ड) या व्यतिरिक्त वाढीव कालावधीसाठी लागणारे मनुष्यबळ - रु.५९.०७ लक्ष

५.३ चर्चेदरम्यान, श्री.ना.वि.मिराणी, सदस्य, कार्यकारी समिती यांनी १०% वाढीव दराचा प्रस्ताव मूळ करारानाम्यामध्ये नमूद आहे किंवा नाही तसेच कराराची मुदत वाढल्यानंतर अधिक फी प्रदान कशा प्रकारे करावी याची तरतूद करारनाम्यात आहे का? याची विचारणा करण्यात आली तसेच सदर बाबी सर्व सदस्यांनी विस्तृतपणे चर्चा केल्यानंतर महानगर आयुक्त यांना सदर बाबी करारनाम्यात अंतर्भूत आहेत का? याबाबतची खात्री करुन त्यानुसार पुढील कार्यवाही करण्याचे अधिकार महानगर आयुक्त यांना प्रदान करण्यात आले. तसेच सदर बाबींचा तपशीलवार कार्यवाही अहवाल आगामी बैठकीत सादर करण्यात यावा असे सांगितले.

५.४ त्यानंतर, बाब टिप्पणीतील प्रस्तावास मान्यता देऊन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :-

**<u>ठराव क्र. १२३६ :</u>**

**“असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ७ चे उपकलम (३) चे पोटकलम (तीन) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन कार्यकारी समिती याव्दारे वांद्रे-कुर्ला संकुलातील मिठी नदीच्या पात्राची रुंदी व खोली वाढविणे, तसेच मिठी नदीच्या परिसराचा विकास करणे यासाठीच्या टप्पा-२ मधील कामावर देखरेख करणे, झालेल्या कामाची मोजमापे घेऊन त्यानुसार कंत्राटदारांची देयके अदा करण्यासाठी शिफारस करणे इ.च्या वाढीव कामासाठी प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार मे. टाटा कन्सल्टींग इंजिनिअर्स लिमिटेड या संस्थेस पूर्वी मंजूर झालेल्या एकूण फी रु. ६०५.४४ लक्ष (सेवा करासहित) च्या अधिक फी रु. १८३.०७ लक्ष (सेवा करासहित) अतिरिक्त फी मंजूर करण्यास मान्यता देत आहे.

**"असाही ठराव करण्यात येत आहे की,** महानगर आयुक्त यांना १०% अधिक दराने भाववाढ मूळ करारनाम्यातील १० % वाढीव दराचा प्रस्ताव व कराराची मुदत वाढल्यानंतर अधिक फी अदा करण्याबाबतची तरतूद व त्यासंबंधीच्या अटी व शर्ती यांची खात्री करुन त्यापुढील कार्यवाहीचे अधिकार महानगर आयुक्त यांना प्रदान करण्यात येत आहे."

**बाब क्र.६ : विस्तारीत नागरी पायाभूत सुविधा (Extd.MUIP) प्रकल्पांतर्गत वसई-भाईंदर जोडणा-या खाडीवरील पूलाच्या बांधकामाकरीता प्रकल्प व्यवस्थापन व संकल्पचित्र पडताळणी करण्याच्या कामाकरिता मे. स्टूप कन्सल्टन्ट प्रा.लि. या सल्लागार संस्थेच्या लघुत्तम निविदेस मंजूरी मिळणेबाबत.**

६.१ या प्रस्तावाबाबत माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, विस्तारीत मुंबई नागरी पायाभूत सुविधा (Extd. MUIP) प्रकल्पांतर्गत नायगाव भाईंदर दरम्यान वसई खाडीवर २ कि.मी. लांबीचा दूपदरी पूलाच्या बांधकामास प्राधिकरणाच्या १२० व्या बैठकीत ठराव क. ११४८ अन्वये रु.१००/- कोटी इतक्या प्रशासकीय खर्चास मान्यता देण्यात आली. सदर काम महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ (MSRDC) यांचे मार्फत करण्याचे ठरविले होते. महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने नेमलेल्या सल्लागारांनी सादर केलेल्या अहवालानुसार सदर प्रकल्पाची अंदाजित किंमत रु.५६० कोटी दर्शविण्यात आली होती. सदर प्रस्तावात पूलाची लांबी ५.६४ कि.मी. व रुंदी १८.५ मी. तसेच तीन ठिकाणी १८० मी. लांबीचे केबल स्टेड पूल प्रस्तावित करण्यात आले होते. सदर प्रकल्प वापरा व हस्तांतरीत करा (BOT) या धर्तीनुसार बांधणे शक्य नसल्याचे महामंडळाने कळविले आहे.

६.२ महानगर आयुक्त यांनी पुढे असेही सांगितले की, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाकडून सदर प्रकल्पास विलंब होत असल्यामुळे मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने सदर प्रकल्प राबविण्याचे ठरविले. यामध्ये सदर प्रस्तावित खाडी पूलाचे नव्याने सर्वेक्षण करुन नविन सरळ रेषेत पूल बांधणे व मुळ प्रकल्पाची किंमत कमी करणे यानुसार वसई व भाईदर यांना जोडणारा पंजू बेटावरुन १२ मी. रुंदीचा व ४.७० कि.मी. लांबीचा खाडीपूल (महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ यांच्या मूळ प्रस्तावात लांबी ५.६४ कि.मी. व रुंदी १८.५ मी. प्रस्तावित होती.) बांधकामाकरीता रु.३००/- कोटी अंदाजित खर्च अपेक्षित असल्याचे ठोस अंदाजपत्रक तयार करुन ठरविण्यात आले. सदर कामाकरीता प्राधिकरणामार्फत नव्याने निविदा मागवून सल्लागार नेमण्याचे ठरविण्यात आले. निविदेमध्ये सल्लागाराकडून निविदापूर्व प्रकिया, निविदा प्रक्रिया व निविदा प्रक्रियेनंतरची कामे (प्रकल्प व्यवस्थापन/प्रत्यक्ष काम करताना पर्यवेक्षकीय कामे) तसेच डिझाईन प्रुफ चेकींग इ. कामे पूर्ण करण्याचे ठरविण्यात आले. सदर सल्लागार नेमणूकीकरीता रितसर मार्गाने निविदा प्रक्रिया पूर्ण

करण्यात आली. यामध्ये दोन सल्लागारांनी निविदा सादर केल्या. यामध्ये ८०% गूण तांत्रीक मुल्यांकन व २०% गूण आर्थिक मुल्यांकनाकरिता देण्यात आले. त्यामध्ये प्रथम लघुत्तम निविदाकार मे. स्टूप कन्सल्टन्ट प्रा.लि. यांच्या १.६०% दराच्या निविदेस मान्यता देण्यात आली.

६.३ श्री. ना.वि. मिराणी, सदस्य, कार्यकारी समिती यांनी सदर पूलांच्या लांबीमध्ये बदल का होत आहे याबद्दल विचारणा केली. त्यावर मुख्य अभियंता यांनी असे स्पष्ट केले की, व्हायाडक्टची लांबी वाढल्यामुळे एकूण पूलाची लांबी वाढली आहे.

६.४ त्यानंतर, बाब टिप्पणीतील प्रस्तावास मान्यता देऊन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :-

**ठराव क्र. १२३७:**

**“असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ७ चे उपकलम (३) चे पोटकलम (तीन) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन कार्यकारी समिती याव्दारे विस्तारीत मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पांतर्गत वसई-भाईंदर जोडणा-या खाडीवरील पूलाच्या बांधकामाकरीता प्रकल्प व्यवस्थापन व संकल्पचित्र पडताळणी करण्याच्या कामाकरिता मे. स्टूप कन्सल्टन्ट प्रा.लि. या लघुत्तम सल्लागार कंपनीस १.६०% दराने रु. ४,८०,००,०००/- (सेवा कर वगळून) किंमतीची निविदा मंजूर करण्यास मान्यता देत आहे.

**“असाही ठराव करण्यात येत आहे की,** वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबंधी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे.”

**बाब क्र.७ : मीरा-भाईंदर महानगरपालिकेच्या महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियानाअंतर्गत (MURM) मंजूर झालेला “पावसाचे पाणी निचरा” या प्रकल्पासाठी कर्ज सहाय्य देणे.**

७.१ या प्रस्तावाबाबत माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, मिरा-भाईंदर महानगरपालिकेने महापालिका क्षेत्रात सद्यस्थितीत असलेल्या नागरी मूलभूत सुविधांचा तुटवडा व भविष्यात त्या सुविधा पुरविण्यासाठी वाढीव गरज लक्षात घेता तसेच लोकसंख्येत होणारी वाढ विचारात घेऊन प्रकल्पांमध्ये पावसाळी पाणी निचरा व्यवस्थापन या प्रकल्पाचा समावेश करण्यात आलेला आहे.

७.२ त्यानंतर, महानगर आयुक्त यांनी असे स्पष्ट केले की, मिरा-भाईंदर महानगरपालिकेचा रु.१७८.७१ कोटीचा पावसाचे पाणी निचरा हा प्रकल्प "महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान (MURM)" अंतर्गत मंजूर झाला असून त्यासाठी वितरित करण्यात येणा-या रु.८९.३६ कोटी अनुदानापैकी मार्च, २०१३ अखेरपर्यंत रु.४४.६८ कोटी एवढी अनुदान रक्कम (दोन टप्प्यात) शासनामार्फत वितरित करण्यात आली आहे. सदर प्रकल्पाचे काम प्रगती पथावर असून मार्च, २०१३ अखेर वितरित अनुदानापैकी रु. १९.४४ कोटी सदर प्रकल्पावर खर्च करण्यात आलेला आहे.

त्याप्रमाणे मिरा-भाईंदर महानगरपालिकेने "महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान (MURM)" मंजूर झालेल्या रु. १७८.७१ कोटीच्या पावसाचे पाणी निचरा या प्रकल्पासाठी महानगरपालिकेचा हिस्सा म्हणून रु. ८९.३६ कोटी (एकूण खर्चाच्या ५० %) प्राधिकरणाला कर्ज मंजूर करण्याची विनंती केली आहे.

७.३ त्यानंतर, महानगर आयुक्त यांनी मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या वित्तीय क्षमतेबाबत असेही सांगितले की, सदर कर्ज प्रस्तावासाठी मिरा-भाईंदर महानगरपालिकेचे वित्तीय स्थितीचे विश्लेषण (Appraisal) महानगरपालिकेने विनंती केल्याप्रमाणे रु.८९.३६ कोटी (एकूण खर्चाच्या ५०%) कर्ज रक्कम गृहीत धरुन करण्यात आले आहे. सदर प्रकल्प हा अ-वाणिज्यिक स्वरुपाचा असल्यामुळे व्याजदर १०% द.सा.द.शे. व कर्ज परतफेड कालावधी १५ वर्षे (कुठल्याही मोरॅटोरियम शिवाय) याप्रमाणे प्रस्तावित केला आहे. सदर कर्ज मुंबई नागरी विकास प्रकल्प - फिरता निधीतून (MUDP-RF) देण्याचे प्रस्तावित आहे. सदर प्रस्तावाची पडताळणी करतेवेळी खालील बाबी विचारात घेण्यात आल्या आहेत :-

अ. महानगरपालिकेकडे मागील ५ वर्षापासून महसुली शिल्लक सतत वाढत असल्याचे दिसून येते. ही महसुली शिल्लक सन २००७-०८ या वर्षी रु. ६८.७९ कोटी होती ती सन २०११-१२ या आर्थिक वर्षापर्यंत रु. १२२.२४ कोटी इतकी वाढली आहे.

ब. प्राधिकरणामार्फत प्रस्तावित रु. ८०.४२ कोटी कर्जाचे वितरण लक्षात घेता पालिकेवर रु.२१.११ कोटी इतका अतिरिक्त कर्ज परतफेडीचा बोजा राहील. तसेच मिरा-भाईंदर महानगरपालिकेने यापूर्वी घेतलेली कर्ज रक्कम व प्रस्तावित प्रकल्पास कर्ज उपलब्ध करुन दिल्यास एकूण वार्षिक कर्ज परतफेडीचा हप्ता रु. ४५.७१ कोटी इतका राहील.

७.४ महानगर आयुक्त यांनी मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या मूल्यांकन अहवालाबाबत असे स्पष्ट केले की, महानगरपालिकेला रु.८९.३६ कोटीचे कर्ज कोणत्याही विशेष अटींशिवाय (जसे मोरॅटोरियम, भांडवली खर्चावरील बंधने) देता येईल असे दिसून येते व महानगरपालिका प्राधिकरणाच्या रु. ८९.३६ कोटी एवढया कर्जाची परतफेड करण्यास सक्षम आहे असे दिसून येते. या आधारे महानगरपालिकेची गुणोत्तर उपयोगिता (Operating Ratio) (महसुली जमा ÷ महसुली खर्च) वर्ष २०१२-१३ ते वर्ष २०२६-२७ या कालावधीत ०.८३ (एक पेक्षा कमी असणे अपेक्षित) पेक्षा कमी आहे तर ऋण गुणोत्तर सेवाव्याप्ती (Debt Servicing Coverage Ratio) (निव्वळ महसूली जमा ÷ कर्ज परतफेड) सतत १.६६ (१.५ पेक्षा जास्त असणे अपेक्षित) पेक्षा जास्त असल्याचे आढळते, हे वित्तीय स्थितीच्या दृष्टीने समाधानकारक आहे.

७.५ महानगर आयुक्त यांनी असेही सांगितले की, मुंबई नागरी विकास प्रकल्प - फिरता निधीच्या कर्ज धोरणानुसार जास्तीत जास्त प्रकल्प किंमतीच्या ९०% कर्जाला मान्यता देवू शकतो. त्यामुळे असे प्रस्तावित करण्यात येते की, मिरा-भाईंदर महानगरपालिकेला पावसाचे पाणी निचरा या प्रकल्पासाठी महानगरपालिकेच्या ५०% हिस्साच्या ९०% (म्हणजे रु. ८९.३६ कोटीच्या ९०%) रु. ८०.४२ कोटीचे कर्ज मुंबई नागरी विकास प्रकल्प - फिरता निधीतून देण्यात येईल. उर्वरित १०% रक्कम रु. ८.९४ कोटी (रु. ८९.३६ कोटीच्या १०%) महानगरपालिकेचे स्वतःच्या स्तोत्रातून खर्च करावे असे गृहित धरण्यात आले आहे.

७.६ महानगर आयुक्त यांनी प्रस्तावित कर्जाच्या अटी व शर्तीबाबत असेही सांगितले की, प्राधिकरणाने स्थानिक संस्थांसाठी मंजूर केलेल्या दिनांक ०६ मार्च, २०१२ रोजीच्या धोरणामध्ये मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या प्रकल्पांसाठी द.सा.द.शे. १०% व्याज आकारण्याचे प्रस्तावित करण्यात येत असून परतफेडीचा कालावधी १५ वर्षे तसेच, सदर कर्ज हे सन २०१४-१५ ते २०१६-१७ या कालावधीत वितरित करण्याचे प्रस्तावित आहे. महानगर आयुक्त यांनी पुढे असेही सांगितले की, प्राधिकरणाच्या कर्ज परतफेडीच्या हमीसाठी कर्जदार संस्थेने बँकेत "कर्ज परतफेड निधी" या नावाने स्वतंत्र खाते उघडणे अथवा अस्तित्वात असलेल्या एस्क्रो खात्याव्दारे प्राधिकरणाच्या कर्जाच्या परतफेडीची हमी प्राप्त होईल.

७.७ महानगर आयुक्त यांनी मिरा-भाईंदर महानगरपालिकेकरिता कर्जाच्या बाब टिप्पणीतील परिच्छेद क्र. १२ व १३ मध्ये प्रस्तावित केलेल्या प्रमुख व इतर अटी व शर्तीच्या अधीन राहून देण्यात येत असल्याचे स्पष्ट केले.

७.८ महानगर आयुक्त यांनी असे प्रस्तावित केले की, मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या "महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान (MURM)" राज्य शासनाने मंजूर केलेल्या रु.१७८.७१ कोटी एकूण प्रकल्प खर्चाच्या ५०% रक्कम रु. ८९.३६ कोटी अनुदान स्वरुपात सदर योजनेतंर्गत शासनामार्फत देण्यात येणार असून उर्वरित एकूण प्रकल्प खर्चाच्या ५०% रक्कमेच्या ९०% म्हणजेच रु. ८०.४२ कोटी (रु.८९.३६ कोटीच्या ९०%) एवढया मिरा-भाईदर महानगरपालिके मार्फत करावयाच्या खर्चासंबंधी पालिकेने केलेली कर्जाची विनंती मान्य करुन मुंबई नागरी विकास प्रकल्प - फिरता निधितून मिरा-भाईंदर महानगरपालिकेस रु.८०.४२ कोटी इतकी कर्ज रक्कम द.सा.द.शे. १०% व्याजदर आकारुन १५ वर्षाच्या कर्ज परतफेडीच्या कालावधीसाठी देण्यास मान्यता दयावी.

७.९ या विषयाच्या चर्चेदरम्यान, मुख्य सचिव व अध्यक्ष, कार्यकारी समिती यांनी मिरा-भाईंदर महानगरपालिकेस आतापर्यंत प्राधिकरणामार्फत देण्यात आलेल्या कर्ज रक्कमेच्या परतफेडीच्या क्षमतेबाबत तसेच नवीन कर्जाच्या कर्ज परतफेडीबाबत विचारणा केली. त्यावर महानगर आयुक्त यांनी असे स्पष्ट केले की, मिरा-भाईंदर महानगरपालिकेस प्राधिकरणामार्फत आजतागायत देण्यात आलेल्या सर्व कर्जाची परतफेड वेळेत सुरु असून त्याबाबत कोणताही विलंब झालेला नाही. तसेच मिरा-भाईदर महानगरपालिकेची वित्तीय क्षमतेच्या विश्लेषणाच्या आधारे सदर नवीन कर्ज घेण्याची क्षमता असल्याचे स्पष्ट केले.

कार्यकारी समितीचे सदस्य श्री. मनु कुमार श्रीवास्तव, प्रधान सचिव (१), नगर विकास विभाग व श्री. श्रीकांत सिंह, प्रधान सचिव (२), नगर विकास विभाग यांनी कर्ज उभारण्यासाठी स्थानिक स्वराज्य संस्थांनी शासनाची पूर्व परवानगी घेतली असल्याबाबत मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने कर्ज प्रस्ताव सादर करण्यापूर्वी खात्री करुन घेणे आवश्यक असल्याबाबतचे मत व्यक्त केले.

मुख्य सचिव व अध्यक्ष, कार्यकारी समिती यांनी "महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान (MURM)" योजनेअंतर्गत इतर स्थानिक स्वराज्य संस्थानी कर्ज प्रस्ताव सादर केले असल्यास त्याबाबतची स्थिती स्पष्ट करण्याचे सूचित केले. त्यानुसार महानगर आयुक्त यांनी असे स्पष्ट केले की, राज्य शासनाच्या "महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान (MURM)" योजनेअंतर्गत कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या मंजूर झालेल्या प्रकल्पांच्या कर्ज प्रस्तावास प्राधिकरणाने मंजूरी दिली असून भिवंडी-निजामपूर महानगरपालिकेची कर्ज घेण्याची क्षमता नसल्याने त्यांचा प्रस्ताव विचारात घेण्यात आलेला नाही. महानगर आयुक्त यांनी असेही स्पष्ट केले की, वर नमूद केलेल्या संस्था व्यतिरिक्त मुंबई महानगर प्रदेशातील इतर स्थानिक स्वराज्य संस्थेने सदर योजनेअंतर्गत प्राधिकरणाकडे कर्ज मागणीचा प्रस्ताव सादर केलेला नाही.

७.१० त्यानंतर, बाब टिप्पणीतील प्रस्तावास मान्यता देऊन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :-

**ठराव क्र. १२३८:**

**"असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम २१ अ अन्वये प्राधिकरणास प्राप्त झालेल्या व त्यास यासंबंधी सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन कार्यकारी समिती याव्दारे मीरा-भाईंदर महानगरपालिकेच्या "महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियानाअंतर्गत (MURM)" अंतर्गत राज्य शासनाने मंजूर केलेल्या पावसाचे पाणी निचरा या प्रकल्पासाठी पालिकेने केलेली कर्जाची विनंती मान्य करुन मुंबई नागरी विकास प्रकल्प - फिरता निधीतून मीरा-भाईंदर महानगरपालिकेस रु.८०.४२ कोटी इतकी कर्ज रक्कम द.सा.द.शे. १०% व्याजदर आकारुन १५ वर्षाच्या कर्ज परतफेडीच्या कालावधीसाठी देण्यास बाब टिप्पणीत प्रस्तावित केलेल्या अटींच्या तसेच कर्ज उभारणीसाठी शासनाची पूर्व परवानगी घेण्याच्या अटींच्या अधीन राहून मान्यता देत आहे.

**"असाही ठराव करण्यात येत आहे की,** कर्जाची रक्कम, व्याजदर आणि कर्ज परतफेडीचा कालावधी या अटींव्यतिरिक्त एस्क्रो खात्यांसंबंधी तपशील व कर्ज परतफेडीतील सुटीचा कालावधी निश्चित करणे, प्रकल्प अंमलबजावणी कालावधी, आगाऊ कर्ज सहाय्य देणे तसेच कर्जाच्या इतर अटी व शर्तींमध्ये आवश्यक सुधारणा करण्यासाठी महानगर आयुक्त यांना कार्यकारी समिती याव्दारे प्राधिकृत करीत आहे. "

**बाब क्र.८ : जे.व्ही.पी.डी. जंक्शन - उड्डाणपूल / योग्य सुधारणा प्रकल्पाकरीता तांत्रिक-आर्थिक सुसाध्यता अभ्यास (TEFS), सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) आणि निविदा कागदपत्रे (Bid Documents) तयार करण्यासाठी मे.लुईस बर्जर ग्रुप यांची सल्लागार म्हणून नियुक्ती करणेबाबत.**

८.१ या प्रस्तावाबाबत माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असे सांगीतले की, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने, मुंबई नागरी विकास प्रकल्पांतर्गत मुंबई शहरात आणि उपनगरात निरनिराळया रस्त्यांचा विकास केला आहे. सी.डी.बर्फीवाला रोड ते एस.व्ही. रोड पर्यंतच्या उड्डाणपुलाचे काम पुर्ण झाले असुन वाहतुकीसाठी खुला करण्यात आलेला आहे. सी.डी. बर्फीवाला रोड ते जयप्रकाश रोड अद्याप विकसित झाला नसल्याने जे.व्ही.पी.डी. जंक्शन वरुन उत्तर अंधेरीत जाण्यास नविन जोडरस्ता हा एकमेव मार्ग आहे. सदर मार्ग हा वाहतुकीने गजबजलेला असून रहदारीस अत्यंत अडथळा होत आहे. मुंबई मेट्रो आराखडयात प्रस्तावित असलेल्या मुंबई मेट्रो लाईन-२ (चारकोप-वांद्रे-मानखुर्द) ही जेव्हीपीडी जंक्शन पार करुन पुढे याच (नविन जोडरस्ता) मार्गे जाते. सदर

मार्ग वाहतुकीच्या कोंडीतुन मुक्त करणे जे.व्ही.पी.डी. जंक्शनसाठी निरनिराळया वाहतुकीच्या पर्यायांचा अभ्यास तसेच चारकोप-वांद्रे-मानखुर्द मेट्रो मार्गाची अंमलबजावणी करताना येणा-या वाहतुकीच्या अडथळयावर वेळीच उपाय योजना करणे, मेट्रो मार्गाच्या स्थानक आणि सभोवतालची वाहतुक यांच्यात योग्य एकात्मिकरण यासाठी प्राधिकरण जेव्हीपीडी जंक्शनचा योग्य त्या सुधारणेसाठी तांत्रिक-आर्थिक सुसाध्यता अभ्यास, सविस्तर प्रकल्प अहवाल आणि निविदा कागदपत्रे तयार करण्यासाठी सल्लागार नियुक्ती करण्याचे प्रस्तावीत आहे.

८.२ प्रस्तावित प्रकल्पाकरीता सल्लागाराकडून विनंती प्रस्ताव पाठविण्याकरीता दिनांक २४ डिसेंबर, २०१२ रोजीच्या वर्तमानपत्रामध्ये जाहिरात प्रसिध्द करण्यात आली आणि सदर जाहिरातीच्या अनुषंगाने दिनांक १५ फेब्रुवारी, २०१३ पर्यंत ६ सल्लागारांचे प्रस्ताव प्राप्त झाले. विनंती प्रस्तावाच्या खंड क्र. ५ अन्वये जो सल्लागार संयुक्तीक तांत्रिक व वित्तीय निकषात जास्त गुण संपादन करेल, त्या सल्लागारास प्रकल्पासाठी सल्लागार म्हणुन नेमण्यात येईल. मे. लुईस बर्जर ग्रुप, मुंबई यांचे संयुक्तिक तांत्रिक व वित्तीय निकषात जास्त गुण असल्यामुळे मे. लुईस बर्जर ग्रुप, मुंबई यांची नेमणूक करण्याची शिफारस मुल्यमापन समितीने केली. त्यास अनुसरुन मे. लुईस बर्जर ग्रुप, मुंबई यांची सल्लागार म्हणून नियुक्ती करण्यासाठीचा प्रस्ताव कार्यकारी समितीच्या मान्यतेसाठी सादर करण्यात आला आहे.

८.३ कार्यकारी समितीचे निमंत्रित सदस्य श्री. आर.ए.राजीव, प्रधान सचिव, पर्यावरण विभाग यांनी, जे.व्ही.पी.डी जंक्शनची सुधारणा करणे अत्यंत गरजेचे असुन जंक्शन लगतच्या रस्त्यांची सुधारणा करणे देखील तितकेच गरजेचे आहे, जेणे करुन वाहतुक अखंड आणि सुरळीत पणे चालु राहील असे सुचविले.

८.४ श्री. द.म. सुकथनकर, सदस्य, कार्यकारी समिती यांनी असे सुचविले की, प्रस्तावित जे.व्ही.पी.डी फ्लॉयओव्हर हा दिर्घकालासाठी उपाय असुन, सद्यपरीस्थितीत फ्लॉयओव्हर पूर्ण होण्याअगोदर वाहतुक रहदारी चालू ठेवण्यासाठी तातडीच्या उपाययोजना करणे गरजेचे आहे. तसेच प्रकल्प व्यवस्थापन सल्लागारांचे पॅनल तयार करावे व त्यामधून सल्लागारांना निरनिराळया प्रकाराची कामे देण्यात यावीत.

८.५ चर्चेच्या दरम्यान महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, सदर प्रकल्पाची अंमलबजावणी करण्यापूर्वी वाहतूक पोलीस आणि बृहन्मुंबई महानगरपालिकेची संमती घेण्यात येईल.

८.६ सध्या शहरात खुप वाहतुक प्रकल्पांची अंमलबजावणी होत असून प्रत्येक अभ्यासाच्या/प्रकल्पांच्या सद्यस्थितींचा मासिक अहवाल वेळोवेळी कार्यकारी समितीकडे पाठविण्याबाबत मा. मुख्य सचिव व अध्यक्ष, कार्यकारी समिती यांनी निर्देश दिले.

८.७ त्यानंतर, बाब टिप्पणीतील प्रस्तावास मान्यता देऊन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :-

**ठराव क्र. १२३९:**

**"असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ७ चे उपकलम (३) चे पोट-कलम (तीन) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन कार्यकारी समिती याव्दारे जे. व्ही.पी.डी. जंक्शन- उड्डाणपुल/योग्य सुधारणा प्रकल्पाकरीता तांत्रिक-आर्थिक सुसाध्यता अभ्यास (TEFS), सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) आणि निविदा कागदपत्रे (Bid Documents) तयार करण्यासाठी मे. लुईस बर्जर ग्रुप, मुंबई यांना रु. ९५,००,०००/- (रुपये पंच्याण्णव लाख फक्त) अधिक सेवा कर एवढया रक्कमेवर नियुक्ती करण्यास मान्यता देत आहे.

**"असाही ठराव करण्यात येत आहे की,** वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबधी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याव्दारे प्राधिकृत करण्यात येत आहे. "

**बाब क्र.९ : साकीनाका जंक्शन ते लाल बहादूर शास्त्री मार्ग जंक्शन दरम्यान अंधेरी घाटकोपर जोडरस्त्याचे उर्वरीत बांधकाम करणे तसेच जय प्रकाश रोड (वर्सोवा ते एस. व्ही. रोड) व अंधेरी घाटकोपर जोडरस्त्याचे देखभाल व दुरुस्ती करणे. - लघुत्तम निविदेस मान्यता मिळणेबाबत.**

९.१ या प्रस्तावाबाबत माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पांतर्गत प्राधिकरणामार्फत विविध ठिकाणी १८ मुख्य रस्त्यांची कामे हाती घेण्यात आलेली होती. त्यापैकी १५ रस्त्यांची कामे पूर्ण करून बृहन्मुंबई महानगरपालिका व सार्वजनिक बांधकाम विभाग यांचेकडे हस्तांतरीत करण्यात आलेले आहेत. अंधेरी - घाटकोपर व जय प्रकाश रस्ता हा मुंबई मेट्रो मार्ग - १ च्या कामासाठी प्राधिकरणाकडे ठेवण्यात आला. या रस्त्यावरील मेट्रोची कामे बऱ्याच अंशी पूर्णत्वास आलेली आहेत. अंधेरी - घाटकोपर जोडरस्त्यावरील साकीनाका ते लाल बहादूर शास्त्री मार्ग या भागातील रस्त्याचे काम मेट्रो मार्ग व स्टेशनच्या कामामुळे हाती घेता आले नाही. सध्या सदरचे मेट्रोचे काम पूर्णत्वाला आले असल्याने तेथील रस्त्याचे काम हाती घेणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे मेट्रोच्या कामामुळे व सेवा वाहिन्यांसाठी करण्यात आलेल्या खोदकामामुळे जय प्रकाश रोड, अंधेरी-घाटकोपर जोडरस्त्यांची बऱ्याच ठिकाणाी दुरूस्ती आवश्यक आहे . सदर दुरूस्तीच्या कामाकरीता तसेच उर्वरित लांबीतील काम पूर्ण करण्यासाठी प्रकल्प सल्लागार मे.एस्.एन्.भोबे ॲन्ड असोशिएट्स यांचेद्वारे रू.२८,३३,४९,९०७/- किंमतीचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले. त्या अनुषंगाने निविदा प्रपत्र तयार करून उपरोक्त कामासाठी दिनांक ०५ ऑगस्ट,

२०१३ रोजी वर्तमानपत्रांमध्ये निविदा सूचना प्रसिध्द करण्यात आल्या. एकूण १८ निविदाकारांनी कोऱ्या निविदा खरेदी केल्या. तथापि, विहीत कालावधीमध्ये ५ निविदा प्राप्त झाल्या त्यापैकी मे.वित्राग कंन्स्ट्रक्शन कंपनी यांची अदांजित खर्चापेक्षा २२.९०% कमी दराची निविदा लघुत्तम होती.

९.२ त्यानंतर, महानगर आयुक्त यांनी असेही सांगितले की, लघुत्तम निविदाकारांची निविदा कामाच्या अंदाजित किंमतीपेक्षा बऱ्याचप्रमाणात कमी असल्यामुळे सदर निविदाकाराकडून याबाबतचा खुलासा मागविण्यात आला. मे.वित्राग कंन्स्ट्रक्शन कंपनी यांनी त्यांचे दिनांक ३० सप्टेंबर, २०१३ च्या पत्रान्वये कमी दराबाबतचा खुलासा सादर केला आहे. बृहन्मुंबई महानगरपालिकेकडे केलेल्या रस्त्याच्या कामाची प्रकल्प सल्लागाराकडून पाहणी करण्यात आली. तसेच मुंबई महानगरपालिकेकडून कंत्राटदाराच्या कामाबाबत अभिप्राय मागविण्यात आला होता. महापालिकेच्या अधिकाऱ्यांनी उपरोक्त कंपनीचे काम समाधानकारक असल्याचे नमूद केले आहे. सल्लागाराने लघुत्तम निविदा मान्य करण्याची शिफारस केली आहे. निविदा मंजूर करण्याबाबत प्रस्ताव निविदा छाननी समितीपुढे ठेवण्यात आला होता. निविदा छाननी समितीने सदर प्रस्तावाची छाननी करून कामाची गुणवत्ता तपासणी त्रयस्थ सल्लागाराकडून करून घेण्याबाबत तसेच सल्लागार आणि कंत्राटदाराकडून प्रकल्प अंमलबजावणीचे वेळापत्रक घेण्याबाबत सूचना केल्या होत्या व या सूचनेच्या अधिन राहून सदर लघुत्तम देकार मान्य करण्याची शिफारस केली होती . त्या अनुषंगाने ही निविदा स्विकृत करण्याचा प्रस्ताव कार्यकारी समितीच्या मान्यतेसाठी सादर करण्यात आला आहे.

९.३ चर्चेदरम्यान, श्री. ना. वि. मिराणी, सदस्य, कार्यकारी समिती यांनी सदर कामाची गुणवत्ता तपासणी त्रयस्थ सल्लागाराकडून करुन घेण्याबाबत सूचना केली.

९.४ मा. मुख्य सचिव व अध्यक्ष, कार्यकारी समिती यांनी सदर रस्त्याच्या देखभाल व दुरुस्तीचे काम पावसाळयापूर्वी पूर्ण करण्यात यावीत असे निर्देश दिले.

९.५ त्यानंतर, बाब टिप्पणीतील प्रस्तावास मान्यता देऊन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :-

**ठराव क्र. १२४०:**

**"असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ७ चे उपकलम (३) चे पोटकलम (तीन) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन कार्यकारी समिती याव्दारे साकीनाका जंक्शन ते लाल बहादूर शास्त्री मार्ग जंक्शन दरम्यान अंधेरी घाटकोपर जोडरस्त्याचे उर्वरीत बांधकाम करणे तसेच जय प्रकाश रोड (वर्सोवा ते एस. व्ही. रोड) व अंधेरी घाटकोपर जोडरस्त्याचे

देखभाल व दुरुस्ती करणे या प्रस्तावित कामासाठी मे.वित्राग कंन्स्ट्रक्शन कंपनी यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा २२.९०% कमी दराची म्हणजे रु.२१,८४,६२,७७८/- (रुपये एकवीस कोटी चौ-याऐंशी लाख बासष्ट हजार सातशे अठ्ठाहत्तर फक्त) किंमतीची लघुत्तम निविदा स्विकारण्यास तसेच सदर कामाची गुणवत्ता तपासणी त्रयस्थ सल्लागाराकडून करुन घेण्यास व त्या अनुषंगाने करण्यात येणा-या करारनाम्यातील अटींप्रमाणे देय होणा-या संभाव्य आर्थिक बदलासह अधिदान करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

**"असाही ठराव करण्यात येत आहे की,** वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबंधी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**बाब क्र.१० : मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पांतर्गत वांद्रे-कुर्ला संकुलातील (जी ब्लॉक) ते पूर्व द्रुतगती महामार्ग यांच्या दरम्यान उन्नत मार्ग बांधण्याच्या कामासाठी व व्हि. एन. पुरव मार्गावरील चुनाभट्टी येथील रेल्वे क्रॉसिंगच्या जागी रेल्वे उड्डाणपूल बांधण्याच्या कामासाठी प्रशासकीय मंजूरी मिळणेबाबत.**

१०.१ या प्रस्तावाबाबत माहिती देताना महानगर आयुक्त यांनी मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पांतर्गत वांद्रे-कुर्ला संकुलातील (जी-ब्लॉक) ते पूर्व द्रुतगती महामार्ग यांच्या दरम्यान प्रस्तावित उन्नतमार्ग बांधण्याच्या प्रकल्पाबाबत माहिती दिली. या प्रकल्पाकरीता वांद्रे-कुर्ला संकुलातील (जी-ब्लॉक) ते पूर्व द्रुतगती महामार्ग यांच्या दरम्यान नवीन विकास आराखडा रस्ता घोषित करण्याकरीता प्राधिकरणाच्या १२२ व्या बैठकीमध्ये मान्यता देण्यात आल्याचे त्यांनी नमूद केले.

१०.२ महानगर आयुक्त यांनी पुढे असेही सांगितले की, सध्या पूर्व द्रुतगती महामार्गाकडून वांद्रे-कुर्ला संकुलाकडे येण्याकरीता धारावीमधून यावे लागते. धारावीमध्ये होणाऱ्या वाहतूक कोंडीमुळे या प्रवासास खूप वेळ लागतो. या प्रकल्पामुळे पूर्व द्रुतगती महामार्गाकडून वांद्रे-कुर्ला संकुलाकडे येण्यास लागणारा वेळ कमी होणार असून त्यामुळे धारावीमध्ये होणारी वाहतूक कोंडीही कमी होण्यास मदत होणार आहे. या प्रकल्पाकरीता प्राधिकरणाने मे.स्टुप कन्सल्टंट प्रा.लि. यांची प्रकल्प सल्लागार म्हणून नेमणूक केली असून त्यांनी तयार केलेल्या अंदाजपत्रकानुसार सदर प्रकल्पाची अंदाजित किंमत रु.३०० कोटी इतकी आहे. या प्रकल्पामध्ये वांद्रे-कुर्ला संकुल ते पूर्व द्रुतगती महामार्गापर्यंत उड्डाणपुल बांधणे व चुनाभट्टी येथे रेल्वे क्रॉसिंगच्या जागी रेल्वे उड्डाणपुल बांधणे या कामांचा समावेश आहे. सदर पुल हा ४ मार्गिकांचा (२+२) असून त्यामध्ये मिठी नदीवरील २६० मी. लांबीचा गाळा असणाऱ्या एक्स्ट्राडोस पध्दतीच्या पुलाचा अंतर्भाव आहे. त्याचप्रमाणे मध्य रेल्वेवर शीव स्थानकाजवळ व हार्बर रेल्वेवर चुनाभट्टी स्थानकाजवळ रेल्वे उड्डाणपुलांचा समावेश आहे. सदर प्रस्तावाबाबत आणि त्यामुळे वाहतूक कोंडी कमी होण्याबाबत जी मदत होणार आहे त्याबाबत थोडक्यात सादरीकरण करण्यात आले.

१०.३ श्री. ना.वि.मिराणी, सदस्य, कार्यकारी समिती यांनी सदर पूलाकरीता ४ मार्गिका (२+२) या वाहतूकीच्या दृष्टीने पुरेशा असल्याची खातरजमा करण्याच्या सुचना केल्या.

१०.४ मा.मुख्य सचिव व अध्यक्ष, कार्यकारी समिती यांनी या प्रकल्पाचे काम सुरु करण्यापूर्वी बृहन्मुंबई महानगरपालिका व वाहतूक पोलीस यांना या प्रकल्पाबाबत अवगत करावे व या प्रकल्पाबाबत त्यांच्या काही सूचना असल्यास त्यांचा या प्रकल्पाची अंमलबजावणी करताना विचार व्हावा व त्यासंबंधीत अहवाल कार्यकारी समितीच्या आगामी बैठकीत सादर करण्यात याव्यात अशा सुचना केल्या.

१०.५ त्यानंतर, बाब टिप्पणीतील प्रस्तावास मान्यता देऊन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :-

**ठराव क्र. १२४१:**

**"असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ७ चे उपकलम (३) चे पोटकलम (तीन) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन कार्यकारी समिती याव्दारे

अ) मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पांतर्गत वांद्रे-कुर्ला संकुलातील (जी ब्लॉक) ते पूर्व द्रुतगती महामार्ग यांच्या दरम्यान उड्डाणपूल बांधणे व

ब) व्हि. एन. पुरव मार्गावरील चुनाभट्टी येथील रेल्वे क्रॉसिंगच्या जागी रेल्वे उड्डाणपूल बांधणे.

या दोन्ही कामांसाठी एकूण रु.३०० कोटीच्या खर्चास प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

**"असाही ठराव करण्यात येत आहे की,** प्रकल्पाच्या अंमलबजावणीसाठी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**बाब क्र.११ : दिनांक ३० जून, २०१३ रोजी संपणा-या त्रैमासिक कालावधीचे लेखे.**

महानगर आयुक्त यांनी प्राधिकरणाच्या दिनांक ३० जून, २०१३ रोजी संपणा-या त्रैमासिक लेख्यांबाबत संक्षिप्त माहिती दिली. त्यानंतर, प्राधिकरणाच्या त्रैमासिक लेख्यांची नोंद घेऊन कार्यकारी समितीने मान्यता दिली.

**बाब क्र.१२ : प्राधिकरणाकडील असलेला अतिरिक्त निधीचा गुंतवणूक अहवाल. दिनांक ०१ फेब्रुवारी, २०१३ ते दिनांक ३१ मे, २०१३**

दिनांक ०१ फेब्रुवारी, २०१३ ते दिनांक ३१ मे, २०१३ पर्यंतच्या प्राधिकरणाकडील अतिरिक्त निधीच्या गुंतवणूक अहवालांची नोंद कार्यकारी समितीने घेतली.

**<u>बाब क्र.१३ अ : मुंबई नागरी विकास प्रकल्प - फिरता निधी : सहामाही व्यवस्थापन अहवाल. दिनांक ०१ ऑक्टोबर, २०१२ ते दिनांक ३१ मार्च, २०१३</u>**

मुंबई नागरी विकास प्रकल्प-फिरता निधीच्या दिनांक ०१ ऑक्टोबर, २०१२ ते दिनांक ३१ मार्च, २०१३ चा सहामाही व्यवस्थापन अहवालाची नोंद कार्यकारी समितीने घेतली.

**<u>बाब क्र.१३ ब : मुंबई नागरी विकास प्रकल्प - फिरता निधी : सहामाही व्यवस्थापन अहवाल. दिनांक ०१ एप्रिल, २०१३ ते दिनांक ३० सप्टेंबर, २०१३</u>**

मुंबई नागरी विकास प्रकल्प-फिरता निधीच्या दिनांक ०१ एप्रिल, २०१३ ते दिनांक ३० सप्टेंबर, २०१३ चा सहामाही व्यवस्थापन अहवालाची नोंद कार्यकारी समितीने घेतली.

**<u>बाब क्र.१४ : वडाळा भारवाहक तळ येथे ९ दक्षलक्ष लिटर प्रति दिवस क्षमतेच्या अल्प जागेत बसणा-या, उर्जा बचतीच्या, ध्वनी प्रदूषणरहीत, आर.एम.बी.आर./रोटेटींग बायोडीस्क कॉन्टॅक्टर/इकोबायांपॅक तंत्रज्ञानावर आधारीत मलःनिस्सारण शुध्दीकरण केंद्राचे बांधकाम तसेच ६० महिने कालावधीसाठी देखभाल व दररोज चालविणे या कामाच्या निविदेस मंजूरी मिळणेबाबत.</u>**

१४.१ सदर बाब टिप्पणीतील प्रस्तावाबद्दल माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, वडाळा भारवाहक तळ आणि आंतरराज्यीय बस स्थानक उभारणीकरिता डिसेंबर, २००५ मध्ये महाराष्ट्र शासनाने मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाची "विशेष नियोजन प्राधिकरण" म्हणून नेमणूक केलेली आहे. महाराष्ट्र प्रादेशिक नगर रचना अधिनियम, १९६६च्या कलम ४० चे उपकलम (३) चे पोटकलम (ड) अंतर्गत प्राधिकरणाने सखोल विश्लेषण करुन विशेष प्राधिकरण हद्दीकरिता नियोजन प्रस्तावाचा मसुदा तयार करुन घेतला होता. सदर मसुदा प्रस्तावास प्राधिकरणाच्या दिनांक १५ ऑक्टोबर, २००८ रोजी झालेल्या १२३ व्या बैठकीत मान्यता दिली आहे. त्याप्रमाणे सदर मसुदा प्रस्ताव नागरिकांच्या सूचना व हरकतींसाठी राजपत्रात प्रसिध्द करण्यात आलेला आहे.

१४.२ महानगर आयुक्त यांनी असेही सांगितले की, महाराष्ट्र शासनाच्या शक्तीप्रदान समितीने दिनांक ५ जून, २०१० रोजी मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या २५ व्या बैठकीत वडाळा भारवाहक तळ येथील संपूर्ण ११५ हेक्टर परिसराचा वांद्रे-कुर्ला संकुलाच्या धर्तीवर आंतरराष्ट्रीय दर्जाच्या मानकांप्रमाणे विकास करावा असे निर्देश दिले आहेत. तद्नंतर, प्राधिकरणाने अंतिम रुप देऊन सादर केलेल्या सुधारीत नियोजन प्रस्तावास दिनांक १६ नोव्हेंबर, २०१० रोजी राज्य शासनाने मंजूरी दिलेली आहे. सदर भागासाठी सुधारीत चटईक्षेत्र निर्देशांक ४ प्रमाणे आहे.

१४.३ त्यानंतर महानगर आयुक्त यांनी असे नमुद केले की, वडाळा भारवाहक तळ भाग-१ येथील इमारतींचे मलःनिस्सारण करण्यासाठी आसपासच्या क्षेत्रामध्ये मलःनिस्सारण वाहिन्यांची यंत्रणा

..२३/-

नसल्याने बृहन्मुंबई महानगरपालिकेने दिनांक १२ सप्टेंबर, २००८ रोजीच्या पत्रान्वये प्राधिकरणास वडाळा भारवाहक तळ क्षेत्रासाठी स्वतंत्र मलःनिस्सारण वाहिन्या व शुध्दीकरण केंद्राचे बांधकाम करण्याचे सुचित केले. बृहन्मुंबई महानगरपालिका यांचेकडून संपूर्ण भाग-१ येथील मलःनिस्सारणाचा आराखडा मंजूर करुन घेऊन त्यानुसार मलःनिस्सारण वाहिन्या टाकण्याचे काम पूर्ण झालेले आहे. तसेच वडाळा भारवाहक तळ भाग-१ येथील भाडे करारावर दिलेल्या भूखंडांवरील इमारतींचे बांधकाम पूर्ण झाल्यामुळे मलःनिस्सारण शुध्दीकरण केंद्राचे बांधकाम लवकरात लवकर करणे आवश्यक आहे. सदर मलःनिस्सारण शुध्दीकरण केंद्राचे बांधकाम जमिनीखाली असणार आहे. बांधकामाच्या सुरक्षिततेसाठी काँक्रीट पाईलींग, तळमजल्यावर बांधकाम, हिरवळ, विजेची व शुध्दीकरण केंद्राची उपकरणे, प्रक्रिया केलेल्या पाण्यासाठी वाहिन्या यांचा समावेश आहे. मलःनिस्सारण शुध्दीकरण केंद्राचे बांधकाम पूर्ण करण्याचा कालावधी अंदाजे १२ महिने (पावसाळयासहित) असून त्यानंतर सदरहू शुध्दीकरण केंद्र ६० महिने कालावधीसाठी व्यवस्थित चालविणे व रोजच्या देखभालीचा वाव याच कंत्राटात अंतर्भूत आहे. सदर कामासाठीचे अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम विभाग/ बृहन्मुंबई महानगरपालिका यांचे प्रचलित दरपत्रक, लगतच्या कंत्राटातील मंजूर दर, दरांचे पृथःकरण व बाजारातील सद्यःस्थितीतील किंमतीनुसार तयार करण्यात आलेले आहे. कामाची अंदाजपत्रकीय किंमत रु.२९.५४ कोटी आहे.

१४.४ महानगर आयुक्त यांनी पुढे असे विषद केले की, वडाळा भारवाहक तळ भाग-१ मधील उपलब्ध जागेच्या पुरेपुर वापरासाठी पारंपारिक पध्दतीचे मलःनिस्सारण शुध्दीकरण केंद्र न बांधता पर्यावरणास पुरक, कमी जागा लागणाऱ्या, चालविण्याचा व देखभालीचा खर्च कमी असणाऱ्या आर.एम.बी.आर./रोटेटींग बायोडीस्क कॉन्टॅक्टर/इकोबायोपॅक तंत्रज्ञानावर आधारीत मलःनिस्सारण शुध्दीकरण केंद्राचे बांधकाम करण्याचे ठरविण्यात आले. सदर तंत्रज्ञान मे. नाईक इन्व्हार्नमेंटल इंजिनिअर्स प्रा. लि. यांनी विकसित केले असून भारत सरकारने दिनांक ०८ सप्टेंबर, २००५ पासून पुढील २० वर्षांसाठी संरक्षित (Patented) केलेले आहे. सदर तंत्रज्ञानावर आधारीत मलःनिस्सारण शुध्दीकरण केंद्राचे बांधकाम सैनिकी अभियांत्रिकी महाविद्यालय, पुणे, केंद्रीय सार्वजनिक बांधकाम विभाग नेरळ, बृहन्मुंबई महानगरपालिकेचे बाणगंगा उच्छंदन केंद्र अशा केंद्र/राज्य, शासकीय/निमशासकीय विभागांमध्ये केलेले असून यशस्विरित्या वापरात आहे. मलःनिस्सारण शुध्दीकरण केंद्राचे बांधकाम भाग-१ (२४.४५ हेक्टर) व भाग-३ (३७.२८ हेक्टर) मधील प्रस्तावित एकूण ६१.७३ हेक्टर क्षेत्रासाठी बांधण्याचे प्रस्तावित आहे. मलःनिस्सारण शुध्दीकरण केंद्रातून प्रक्रिया झालेले पाणी इमारतीमध्ये पुर्नवापर, बागबगीच्यांना पाणी, अंतर्गत रस्ते धुण्यासाठी व भूपृष्ठाखालील

..२४/-

पाणी पुर्नभरणासाठी वापरण्याचे प्रस्तावित आहे. बृहन्मुंबई महानगरपालिकेने सदर ९००० घन मी./प्रति दिवस क्षमतेच्या मल:निस्सारण शुध्दीकरण केंद्रास दिनांक १४ डिसेंबर, २०१२ रोजीच्या पत्रान्वये मंजूरी दिलेली आहे.

१४.५ महानगर आयुक्त यांनी पुढे असेही विषद केले की, सदर कामासाठीची निविदा सूचना दिनांक ०९ मे, २०१३ रोजी दैनिक "मिड डे", दैनिक "पुढारी" या वृत्तपत्रात व प्राधिकरणाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द केली होती. सदर निविदेसाठीचे कोरे संच एकूण ६ निविदाकारांनी खरेदी केले होते व त्यापैंकी एकूण २ निविदाकारांनी निविदा सादर केल्या. प्राप्त निविदांच्या छाननीत दोन्ही निविदाधारक पात्र ठरविण्यात आले व त्यांच्या आर्थिक निविदा उघडण्यात आल्या. या देकारामध्ये मे. हिरानी इंटरप्रायझेस-नाईक (JV) यांची (-) १९.६० टक्के (%) इतक्या कमी दराची निविदा लघुत्तम आहे. लघुत्तम निविदाकारास देकाराच्या समर्थनार्थ स्पष्टीकरण मागविण्यात आल्यानुसार निविदाकाराने स्पष्टीकरण सादर केले आहे. सदर लघुत्तम निविदाकाराने दिलेल्या स्पष्टीकरणाचे सखोल विश्लेषण प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार मे. वॅपकॉस लिमिटेड यांनी केले आहे. त्यांच्या विश्लेषणाप्रमाणे अंदाजपत्रक किंमतीच्या ७०% किंमत ही बांधकामाशी संबंधित असून लघुत्तम निविदाकाराकडे बांधकाम करण्यासाठी आवश्यक असणारे साधन सामुग्री, यंत्रसामुग्री, रेडीमिक्स कॉंक्रीट प्लान्ट स्वमालकीचे असल्यामुळे कामासाठी लागणाऱ्या साधन सामुग्रीच्या घटकावरील खर्चात बचत होणार आहे. त्यामुळे लघुत्तम कंत्राटदाराने दराच्या समर्थनार्थ दिलेले स्पष्टीकरण योग्य व सुसंवादी असून लघुत्तम देकार स्विकृत करण्याजोगा असल्याचे प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार यांनी नमूद केलेले आहे. कार्यकारी समितीच्या निर्देशाप्रमाणे स्विकृत निविदांच्या मुल्यांकनासाठी नेमलेल्या निविदा समितीने मे. हिरानी इंटरप्रायझेस - नाईक (JV) यांच्या लघुत्तम देकाराची मंजूरीकरीता शिफारस केलेली आहे.

१४.६ सदर प्रस्तावावर चर्चा करतांना मा. मुख्य सचिव व अध्यक्ष, कार्यकारी समिती यांनी सदर कामाची निविदा फक्त "मिड डे" व "पुढारी" या दैनिक वृत्तपत्रात प्रसिध्द केल्याबद्दल व ई-निविदा पध्दत न वापरल्याबद्दल विचारणा केली. महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, निविदा सूचना या शासन निर्णयानुसार मंजूर केलेल्या वृत्तपत्रात आळीपाळीने प्रसिध्द करण्यात येतात. तसेच सध्या ई-निविदा पध्दतीचे अधिकाऱ्यांना प्रशिक्षण देण्याचे वर्ग सुरु असून दिनांक १ डिसेंबर, २०१३ पासून ई-निविदा पध्दत प्रत्यक्षात सुरु होणार आहे. मा. मुख्य सचिव व अध्यक्ष, कार्यकारी समिती यांनी असेही निर्देश दिले की, प्राधिकरणामार्फत राबविण्यात येणाऱ्या कामांसाठीची निविदा कमीत कमी एका राष्ट्रीय पातळीवरील वृत्तपत्रात प्रसिध्द करावी.

..२५/-

१४.७ मा. मुख्य सचिव व अध्यक्ष, कार्यकारी समिती यांनी मल:निस्सारण शुध्दीकरण केंद्राचे बांधकाम करण्यासाठी इकोबायोपॅक तंत्रज्ञानाचाच पर्याय का निवडला याबाबत विचारणा केली. महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, बृहन्मुंबई महानगरपालिकेने वडाळा भारवाहक तळ येथील मल:निस्सारण शुध्दीकरण केंद्रासाठी प्रस्तावित इकोबायोपॅक तंत्रज्ञानास मंजूरी दिलेली आहे. सदर तंत्रज्ञान सैनिकी अभियांत्रिकी महाविद्यालय पुणे, केंद्रीय सार्वजनिक बांधकाम विभाग नेरळ, बृहन्मुंबई महानगरपालिकेचे बाणगंगा उदंचन केंद्र अशा केंद्र/राज्य, शासकीय/निमशासकीय विभागांमध्ये केलेले असून यशस्विरित्या वापरात आहे. महानगर आयुक्तांनी यावेळी प्रस्तावित इकोबायोपॅक तंत्रज्ञान हे पारंपारीक पध्दतीच्या व सद्य:स्थितीत उपलब्ध असलेल्या इतर प्रगत तंत्रज्ञानाच्या तुलनेत बांधकामासाठी लागणारी जागा, भांडवली खर्च, ध्वनी, गंध, दुसऱ्या जागी पुर्नस्थापन करणे, सुट्टया भागांची उपलब्धता व उपयोगीता, प्रक्रियेसाठी लागणारी विज, दैनंदिन चालविणेसाठीचा खर्च याबाबत फायदेशीर असल्यासंबंधी तुलनात्मक तक्ता सादर केला.

१४.८ कार्यकारी समितीचे सदस्य श्री. मनु कुमार श्रीवास्तव, प्रधान सचिव (१), नगर विकास विभाग यांनी असे सांगितले की, सदर कामासाठी दोनच निविदा सादर झाल्या असून मे. नाईक इन्व्हार्नमेंटल इंजिनिअर्स प्रा. लि. यांनी दोन्ही नि विदाकांरासोबत संयुक्त भागीदारीत निविदा सादर केलेली आहे. सदर मल:निस्सारण शुध्दीकरण केंद्राचे तंत्रज्ञान संरक्षित (Patented) असल्याने मे.नाईक इन्व्हार्नमेंटल इंजिनिअर्स प्रा. लि. यांची संयुक्त भागीदारीतील निविदा निर्णायक असून त्यांनी दोन्ही निविदाकारांना वेगवेगळे दर दिल्याने स्पर्धा नियंत्रित झाली असल्याची शक्यता व्यक्त केली. सदर सूचनेवर महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, प्रत्यक्ष कामामध्ये मे. नाईक इन्व्हार्नमेंटल इंजिनिअर्स प्रा. लि. यांच्या संरक्षित तंत्रज्ञानाचा खर्च केवळ ३० % असून इतर ७०% रक्कम ही केंद्राचे स्थापत्य बांधकाम करण्यासाठी आहे. त्यामुळे सदर निविदा प्रक्रियेवर त्यांचे नियंत्रण असण्याची शक्यता नाही. श्री. द.म.सुकथनकर, सदस्य, कार्यकारी समिती यांनी सुध्दा अंदाजपत्रक किंमतीच्या ७०% किंमत ही बांधकामाशी संबंधित असून निविदा सादर करतेवेळी बांधकाम करणारा निविदाकार निर्णायक असल्याचे सांगितले.

१४.९ कार्यकारी समितीचे सदस्य श्री. संजय भाटीया, व्यवस्थापकीय संचालक, सिडको यांनी असे सांगितले की, सादर झालेल्या दोन्ही निविदा या कमी दराच्या आहेत. वडाळा भारवाहक तळ येथील प्रस्तावित मल:निस्सारण शुध्दीकरण केंद्र हे कमी क्षमतेचे असून प्राधिकरणास चांगल्या दराची निविदा मिळाली असल्याने सदर लघुत्तम निविदा स्विकारण्यात हरकत नसावी.

१४.१० मा. मुख्य सचिव व अध्यक्ष कार्यकारी समिती यांनी कार्यकारी समितीचे निमंत्रित सदस्य श्री. आर.ए. राजीव, प्रधान सचिव, पर्यावरण विभाग यांना ते यापूर्वी ठाणे महानगरपालिकेचे आयुक्त असतांना ठाणे महानगरपालिकेच्या हद्दीत मल:निस्सारण शुध्दीकरण केंद्रासाठी कोणते तंत्रज्ञान वापरले याची विचारणा केली. त्यावर कार्यकारी समितीचे निमंत्रित सदस्य श्री. आर. ए. राजीव, प्रधान सचिव, पर्यावरण विभाग यांनी ठाणे महानगरपालिकेत १०० एम.एल.डी. क्षमतेचे व नवी मुंबई महानगरपालिकेत १२० एम.एल.डी. क्षमतेच्या शुध्दीकरण केंद्राचे काम C-Tek कंत्राटदाराने Sequential (Cyclic) batch reactor या तंत्रज्ञानावर आधारीत बांधकाम केले असल्याचे सांगितले. मा. मुख्य सचिव व अध्यक्ष, कार्यकारी समिती यांनी बैठकीदरम्यान सादर केलेल्या तुलनात्मक तक्त्यामध्ये प्रस्तावित इकोबायोपॅक तंत्रज्ञानाची तुलना Sequential (Cyclic) batch reactor या तंत्रज्ञानावर करण्यासंबंधी सूचित केले. सदर तंत्रज्ञानांचा तुलनात्मक तक्ता महानगर आयुक्त यांच्या स्तरावर सादर करुन जर प्रस्तावित इकोबायोपॅक तंत्रज्ञान Sequential (Cyclic) batch reactor या तंत्रज्ञानापेक्षा सदर शुध्दीकरण केंद्राकरीता सुयोग्य असेल याची खात्री करुन घ्यावी. त्यानंतर महानगर आयुक्त यांनी असे स्पष्ट केले की, यासंबंधीचा स्वतंत्र प्रस्ताव मा. मुख्य सचिव व अध्यक्ष, कार्यकारी समिती यांच्या मान्यतेसाठी सादर करण्यात येईल. सदर मान्यतेच्या अधिन राहून बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करावा अशी विनंती महानगर आयुक्त यांनी कार्यकारी समितीस केली.

१४.११ त्यानंतर, बाब टिप्पणीतील प्रस्तावास मान्यता देऊन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :-

**ठराव क्र. १२४२:**

**"असा ठराव करण्यात येत आहे की,** सदर तंत्रज्ञानांचा तुलनात्मक तक्ता महानगर आयुक्त यांच्या स्तरावर सादर करुन जर प्रस्तावित इकोबायोपॅक तंत्रज्ञान Sequential (Cyclic) batch reactor या तंत्रज्ञानापेक्षा सुयोग्य असेल याची खात्री महानगर आयुक्तांनी करुन त्यानंतर, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ७ चे उप कलम (३) चे पोटकलम (तीन) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि त्याबाबत त्यास सहाय्यभूत होणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन, कार्यकारी समिती याद्वारे वडाळा भारवाहक तळ भाग-१ येथील ९ दशलक्ष लिटर प्रति दिवस क्षमतेच्या मल:निस्सारण शुध्दीकरण केंद्राच्या कामाकरीता खालील दर्शविलेल्या निविदाकाराची न्युनत्तम निविदा व त्या अनुषंगाने करण्यात येणाऱ्या करारनाम्यातील अटींप्रमाणे देय होणाऱ्या संभाव्य आर्थिक बदलासह स्विकारण्यास कार्यकारी समिती मान्यता देत आहे.

| अ. क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय किंमत (रुपये) | लघुत्तम निविदाकाराचे नाव | लघुत्तम देकार | देकाराची रक्कम (रुपये) |
|---|---|---|---|---|---|
| १ | वडाळा भारवाहक तळ येथे ९ दशलक्ष लिटर प्रति दिवस क्षमतेच्या अल्प जागेत बसणाऱ्या, ऊर्जा बचतीच्या, ध्वनी प्रदूषणरहीत, आर.एम.बी.आर./ रोटेटींग बायोडीस्क कॉन्टॅक्टर/ इकोबायोपॅक तंत्रज्ञानावर आधारीत मलःनिस्सारण शुध्दीकरण केंद्राचे बांधकाम तसेच ६० महिने कालावधीसाठी चालविणे व देखभाल. | २९,५४,००,०००/- | मे. हिरानी इंटरप्रायझेस- नाईक (JV) | (-) १९.६०% कमी दराने | २३,७५,०१,६००/- |

**"असाही ठराव करण्यात येत आहे की,** मा. मुख्य सचिव व अध्यक्ष, कार्यकारी समिती यांना सादर करण्यात येणा-या प्रस्तावाच्या मान्येतेस अधिन राहून तसेच वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबंधी आवश्यक ती पुढील कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**बाब क्र.१५ : मोनोरेल प्रकल्पाच्या कार्य आणि देखभाल देयक अनुसूचिमध्ये सुधारणा आणि तफावत खर्चास मान्यता देण्याबाबत.**

१५.१ उपरोक्त प्रस्तावाबाबत माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, कंत्राटदार (LTSE) यांच्याबरोबर झालेल्या करारनाम्यानुसार टप्पा-१ (वडाळा-चेंबूर) २४ महिन्यात प्रवाशांसाठी सुरु करावयाचा असून टप्पा-२ (वडाळा-संत गाडगे महाराज चौक) ३० महिन्यात प्रवाशांसाठी सुरु करावयाचा आहे. त्यानंतर तीन वर्षाचा कार्य व देखभाल कालावधी सुरु होतो. तसेच, करारनाम्यातील देयक पत्रकानुसार कार्य आणि देखभालीसाठी तीन वर्षाकरीता मोनोरेलच्या टप्पा-१ आणि टप्पा-२ करीता फेरी प्रति वर्ष वेगवेगळ्या दर्शविण्यात आलेल्या आहेत. परंतु टप्पा-२ पूर्ण होईपर्यंत टप्पा-१ प्रवासी सेवा सुरु करण्याकरिता (६ महिन्यांचा कालावधी) तरतुद देयक पत्रकामध्ये दर्शविण्यात आलेली नाही. त्यामुळे देयक पत्रकातील केवळ टप्पा-१ सुरु करण्याकरिता प्रति फेरी दर निश्चित करुन देयक पत्रकामध्ये सुधारणा करणे गरजेचे आहे. म्हणून टप्पा-१ प्रवासी सेवा प्रति फेरी दर ठरविण्यासाठी मोनोरेल डेपो मधील निश्चित खर्च (Fixed Cost) जसे डेपो मधील कर्मचारी, साधनसामुग्री, डेपोतील वीजखर्च, कार्य आणि देखभाल खर्च, इत्यादी प्रतिपूर्ती करणे आवश्यक असून केवळ एक टप्पा कार्यान्वित करण्यामुळे कमी होऊ शकत नाही. सदर निश्चित खर्च दोन्ही टप्पे कार्यान्वित झाल्यानंतर वाढणार नाही. त्यामुळे केवळ टप्पा-१ प्रवासी सेवा चालविण्यासाठी प्रति फेरीस विभाजन खर्च जास्त असून दोन्ही टप्पे सुरु झाल्यानंतर प्रति फेरीस विभाजन खर्च कमी होईल. त्यानुसार

..२८/-

टप्पा-१ व टप्पा-२ साठी, कार्य आणि देखभाल कालावधी अभिसंगत / जुळवणीच्या दृष्टीने देयक पत्रकात दुरुस्ती करण्यासाठी कंत्राटदाराने (LTSE) त्याअनुषंगाने प्रस्ताव सादर केले.

१५.२ महानगर आयुक्त यांनी पुढे माहिती देताना असे सांगितले की, दिनांक ०७ जून, २०१२ रोजी कंत्राटदाराने (LTSE) अटी व शर्तीच्या अधिन राहून रु. २,३२,४१,५६०/- प्रती महिना (कर वगळता) निश्चित देयक (Fixed cost) व त्याचबरोबर रु. २३९२/- प्रती फेरी (कर वगळता) प्रती महिना (Variable cost) देयकासाठी प्रस्ताव सादर केला.

तद्नंतर, विस्तृत पत्र व्यवहारास अनुसरुन कंत्राटदाराने (LTSE) दिनांक २६ मार्च, २०१३ च्या पत्रानुसार खालीलप्रमाणे सुधारीत प्रस्ताव सादर केला आहे. सध्याच्या कराराअंतर्गत असलेल्या रु. ३१६०/- प्रति फेरी + रु. ९७१/- प्रति फेरी (एकूण रु. ४१३१/- प्रति फेरी) याप्रमाणे टप्पा-१ च्या पहिल्या वर्षाकरिता कार्य आणि देखभाल दरामध्ये अतिरिक्त खर्च दर्शविण्यात आला आहे. सुधारीत प्रस्तावामध्ये प्रचलित कराचा अंतर्भाव नसून सदरच्या करांची प्रतिपूर्ती प्रत्यक्ष प्रदानाद्वारे मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत करण्यात येईल.

१५.३ महानगर आयुक्त यांनी पुढे असेही सांगितले की, सल्लागाराने बारकाईने पृथःकरण करून त्यांच्या दिनांक २२ एप्रिल, २०१३ रोजीच्या पत्र क्र क्र.LBG/ Monorail/MMRDA/CONT/११९८-१३ अन्वये करारनाम्यात पहिल्या सहा महिन्यांसाठी अतिरिक्त खर्च रु. ९७१/- प्रति फेरी ऐवजी रु. ९३४/- प्रति फेरी म्हणजेच रु. २५६४/- + रु. ९३४/- = रु. ३४९८/- प्रति फेरी (सर्व करांसहित सेवा कर वगळता) ५६८ प्रवाशांसाठी अशी शिफारस केली आहे. सल्लागाराने शिफारस केल्याप्रमाणे कंत्राटदारास सुधारीत देयक पत्रकानुसार प्रति फेरी रक्कम / देयक अदा करण्यात येईल.

१५.४ श्री. द. म. सुकथनकर, सदस्य, कार्यकारी समिती यांनी अशी विचारणा केली की, सदर वाढीव प्रति फेरी दर किती कालावधीसाठी लागू राहणार आणि भविष्यात यात कोणती वाढ होणार आहे काय? त्याबाबत महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, सदर वाढीव प्रति फेरी दर हा प्रथम सहा महिन्यांसाठी असून टप्पा-१ व टप्पा-२ साठी , संयुक्त कार्य आणि देखभाल कालावधी अभिसंगत / जुळवणीच्या दृष्टीने देयक पत्रकात दुरुस्ती करण्यात येत असून टप्पा-२ प्रवासी सेवा कार्यान्वित करण्यास सहा महिन्यापेक्षा जास्त कालावधी लागल्यास प्रस्तावित वाढीव प्रति फेरी दर पुढील काळात, टप्पा-२ प्रवासी सेवा सुरु होईपर्यंत चालू ठेवण्याबाबतही प्रस्ताव बाब टिप्पणीत सादर केला आहे.

१५.५ मा. मुख्य सचिव व अध्यक्ष, कार्यकारी समिती यांनी अशी विचारणा केली की, मोनोरेलसाठी प्रवासी भाडे किंवा दर कसे असणार आहेत? तसेच, श्री. द. म. सुकथनकर, सदस्य, कार्यकारी समिती

यांनी पुढे अशी विचारणा केली की, रेव्हेन्यू बॉक्समध्ये (Revenue Box) कोणतीही कमतरता / उणीव आहे का त्याबाबत महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, मोनोरेलचे भाडे अंदाजे ८ ते २२ रुपये असे असून तसा प्रस्ताव शासनाच्या मान्यतेस सादर केलेला आहे. त्याबाबत लवकरच महाराष्ट्र शासनातर्फे अधिसुचना प्रसिद्धी करण्यात येईल. तसेच रेव्हेन्यू बॉक्सबाबत (Revenue Box) M/s Rites यांनी सादर केलेल्या अहवालात उणीव / कमतरता असून ती काही प्रमाणात मोनोरेल मधील जाहिरात, मोनोरेल कामावरील जाहिराती इत्यादी स्त्रोतामधून कमी करण्यात येईल.

१५.६ श्री. द. म. सुकथनकर, सदस्य, कार्यकारी समिती यांनी अशी सुचना केली की, मोनोरेल / मेट्रो रेलचे भाडे ठरविण्यासाठी Fare Fixation Committee (भाडे स्वतंत्र संस्था) स्थापन केलेली आहे का? याबाबत महानगर आयुक्त यांनी खुलासा केला की, मोनोरेल प्रकल्प मेट्रो कायद्याअंतर्गत येणार असून सदर कायद्याअंतर्गत वेगळी Fare Fixation Committee (भाडे स्वतंत्र संस्था) स्थापन करण्यात येईल.

१५.७ कार्यकारी समितीचे सदस्य श्री.मनु कुमार श्रीवास्तव, प्रधान सचिव (१), नगर विकास विभाग यांनी अशी विचारणा केली की, सदर वाढीव प्रति फेरी दर हा कोणत्या आधारे निश्चित केला असून, कार्य व देखभालीचा कालावधी कधी चालू होतो आणि प्राधिकरणावर यामुळे किती अधिभार येणार आहे. तसेच या व्यतिरिक्त सहा महिन्यांच्या कालावधीत कोणता दर आकारण्यात येईल. याबाबत महानगर आयुक्त यांनी असा खुलासा केला की, मोनोरेल प्रकल्पाचे सल्लागार मे. लुईस बर्जर ग्रुप (LBG) यांनी बारकाईने पृथःकरण करुन रु. ३१६०/- प्रति फेरी + रु. ९७१ प्रति फेरी (रु. ४१३१/- प्रति फेरी) याऐवजी रु. २५६४/- + रु. ९३४/- (रु. ३४९८/- प्रति फेरी) अशा वाढीव दराची शिफारस केली असून सदर वाढीव दराचे प्राधिकरणाने सुद्धा (वित्त व लेखा विभाग) गणना आणि दर तपासले आहे. वाढीव दर हा जोडपत्र २ मध्ये जोडण्यात आलेल्या कोष्टकानुसार मोनोरेल डेपोनुसार निश्चित खर्च डेपोमधील कर्मचारी, साधनसामुग्री, डेपोतील वीजखर्च, कार्य आणि देखभाल खर्च इत्यादी गोष्टी लक्षात घेऊन परिवेळ काढलेला आहे. तसेच कार्य आणि देखभालीचा कालावधी प्रवासी सेवेसाठी मोनोरेल सुरु केल्यानंतर लगेच सुरु होतो. कार्यकारी समितीने अशी सूचना केली की, मोनोरेल प्रकल्पाचा तीन वर्षाचा कार्य आणि देखभाल कालावधी टप्पा -१ आणि टप्पा-२ संयुक्तरित्या प्रवाशी सेवेसाठी सुरु केल्यानंतर सदर कालावधी गृहित धरण्यात यावा. याबाबत महानगर आयुक्त यांनी सहमती दर्शवून असेही सूचित केले की, सदर सूचनेमध्ये प्राधिकरणाचे हित असून सदर कंत्राटदारांना त्यांच्या सहमतीविषयी विचारणा करण्यात येईल.

१५.८ त्यानंतर, बाब टिप्पणीतील प्रस्तावास मान्यता देऊन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :-

**<u>ठराव क्र.१२४३ :</u>**

“**असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ७ चे उपकलम (३) चे पोटकलम (तीन) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन कार्यकारी समिती याद्वारे मे. लार्सन ॲण्ड टुब्रो इंडिया आणि स्कोमी इंजिनिअरिंग बीएचडी, मलेशिया समुहाने सादर केलेल्या आणि प्रकल्प व्यवस्थापन सल्लागाराने शिफारस केल्याप्रमाणे देयक अनुसूचीमध्ये (Payment Schedule) खालीलप्रमाणे दुरुस्ती करण्यास मान्यता देत आहे :-

| **करारनाम्यातील सुधारणा (५६८ प्रवाश्यांसाठी / ४ डब्यांची रेल)** | | | |
|---|---|---|---|
| | **फेऱ्यांची संख्या** | **दर/फेरी (रु.)** | **एकूण खर्च** |
| **वर्ष १** | | | |
| टप्पा १ | ३६,८८७ | रु. ३४९८ | रु. १२,९०,३०,७२६ (पहिल्या ६ महिन्यांकरिता) |
| | ३६,८८७ | रु.२५६४ | रु. ९,४५,७८,२६८ (नंतरच्या ६ महिन्यांकरिता) |
| टप्पा २ | ५७,५८० | रु. २५६४ | रु. १४,७६,३५,१२० (६ महिन्याकरिता) |
| | | **रक्कम वर्ष १** | **रु. ३७,१२,४४,११४** |
| **वर्ष २** | | | |
| टप्पा १ | ७३,७७८ | रु. ३१३१ | रु. २३,०९,९८,९१८ |
| टप्पा २ | १,१५,१६६ | रु. ३१३१ | रु.३६,०५,८४,७४६ |
| | | **रक्कम वर्ष २** | **रु. ५९,१५,८३,६६४** |
| वर्ष ३ | | | |
| टप्पा १ | ७३,७७५ | रु. ३७९० | रु. २७,९६,०७,२५० |
| टप्पा २ | १,१५,१६० | रु. ३७९० | रु. ४३,६४,५६,४०० |
| | | **रक्कम वर्ष ३** | **रु. ७१,६०,६३,६५०** |
| | | **कार्य व देखभालीची एकूण रक्कम रु.** | **रु. १६७,८८,९१,४२८** |

“**असाही ठराव करण्यात येत आहे की,** टप्पा-२ प्रवासी सेवा कार्यान्वित करण्यास ६ महिन्यांपेक्षा जास्त कालावधी लागेल. वरील प्रमाणे वाढीव प्रति फेरी दर पुढील काळात टप्पा-२ प्रवासी सेवा सुरु होईपर्यंत चालू ठेवण्यास अनुमती देण्याकरिता मा. महानगर आयुक्त यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

“**पुढे असा ठराव करण्यात येत आहे की,** वरील ठरावांची अंमलबजावणी करण्यासंबंधी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे. ”

**<u>बाब क्र.१६ :</u>** **<u>फ्लँडर इन्व्हेस्टमेंट अँण्ड ट्रेड कंपनी मार्फत मुंबई महानगर प्रदेशाकरिता व्यापक परिवहन व्यवस्था अंतर्गत (CTS) प्रकल्प सुसाध्यता अध्ययन अहवाल.</u>**

१६.१ या प्रस्तावाबाबत माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, उपरोक्त प्रस्तावासंबंधी दिनांक २८ जानेवारी, २०१३ रोजी झालेल्या कार्यकारी समितीच्या २३७ व्या बैठकीत चर्चा संपन्न झाली होती. या चर्चेच्यावेळी काही महत्वाच्या प्रकल्पांसाठी आंतरराष्ट्रीय तज्ञांना सल्लागार म्हणून नियुक्त करण्याबाबत मत व्यक्त झाले होते. तसेच काही सदस्यांची आंतरराष्ट्रीय तज्ञ सल्लागार कंपन्या जास्त शुल्क आकारतात म्हणून त्यांची नियुक्ती केवळ निविदा प्रक्रिया अंती व्हावी, जेणे करुन सल्लागार सेवेसाठी योग्य तेच शुल्क आकारले जाईलअशी सूचना केली होती. त्यावर काही सदस्यांनी असे सुचविले की, खुल्या निविदा प्रक्रियेमध्ये विदेशी कंपन्यांना वाव मिळणे अतिशय कठीण आहे व त्यामुळे अद्ययावत तंत्रज्ञानाची देवाण-घेवाण होण्यास संधी मिळत नाही. आंतरराष्ट्रीय दर्जाचे तंत्रज्ञान आपल्या प्रकल्पांसाठी उपलब्ध व्हावे व प्रकल्पांची कामे अधिकाधिक उत्तम दर्जाची तसेच सौंदर्यपूर्ण व्हावीत यासाठी अशा सल्लागारांच्या नेमणूका उपयुक्त ठरतील. तसेच काही महत्वाच्या प्रकल्पांसाठी दोन आंतरराष्ट्रीय शासकीय यंत्रणांमध्ये संयुक्त स्वरुपाचा सामंज्यस करार करुन आंतरराष्ट्रीय दर्जाचे तज्ञ नेमणूक करण्यास हरकत नसावी असे मत व्यक्त केले होते.

१६.२ त्यानंतर, महानगर आयुक्त यांनी सांगितले की, या अनुषंगाने फ्लँडर इन्व्हेस्टमेंट अँण्ड ट्रेड कंपनीने घाटकोपर ते कोपरखैरणे व रेवस ते करंजा या दोन्ही पुलांचा तांत्रिक व आर्थिक सुसाध्यता अहवाल तयार करण्यासाठी मे.एन.पी.ब्रिजींग या बेल्जियम कंपनीची शिफारस केली असून १० लक्ष युरो एवढया खर्चाच्या ५०% वाटा उचलण्याचे मान्य केले आहे. सर्वंकष वाहतूक अभ्यासामध्ये घाटकोपर ते कोपरखैरणे व रेवस ते करंजा या दोन मोठया पुलांच्या प्रकल्पांचा समावेश आहे. मुंबईतील वाढत्या वाहतुकीचा विचार करता नजीकच्या भविष्यात या दोन्ही पुलांच्या प्रकल्पाची अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. त्याचबरोबर या प्रकल्पांसाठी सल्लागार सेवा शुल्काची अंदाजित किंमत, यापूर्वी अशा स्वरुपाच्या मोठया पुलाच्या प्रकल्पाच्या निविदा प्रक्रियेअंती निश्चित झालेल्या शुल्कावर आधारीत ठरविण्यात आली आहे.

१६.३ महानगर आयुक्त यांनी असेही सांगितले की, वरील दोन्ही खाडी पुलांचे संकल्पन सौंदर्यपूर्ण करण्यासाठी सविस्तर तांत्रिक व आर्थिक सुसाध्यता अहवालाचे काम हाती घेण्याच्या दृष्टीने व काम करताना येणा-या अडचणींचा अभ्यास करण्यासाठी तसेच भूसंपादन प्रस्ताव, पर्यावरण संतुलन

मुल्यांकन (Environmental Impact Assessment) अहवाल तसार करणे इत्यादी आवश्यक बार्बीसाठी व्यावसायिक तज्ञांची नियुक्ती करणे आवश्यक आहे. या दृष्टीकोनातून मे.एन.पी.बिजिंग या कंपनीची क्षमता व अनुभव विचारात घेता या दोन पुलांचा प्रकल्प सुसाध्यता अहवाल त्यांच्याकडून करुन घेतल्यास तो उपयुक्त ठरणार आहे. सदर कंपनीने अशा प्रकारचे अनेक प्रकल्प (विशेषःत गुतागुतीचे पूल) युरोप खंडातील देशांत राबविली असून त्यातील नाविन्यपूर्ण संकल्पना सदर प्रकल्पांत राबविता येणे शक्य आहे. मा.मुख्य सचिव व अध्यक्ष, कार्यकारी समिती आणि महानगर आयुक्त यांनी सप्टेंबर, २०१३ मध्ये बेल्जिअम दौ-यामध्ये सदर कंपनीच्या प्रकल्पांना समक्ष भेट देऊन त्यांच्या क्षमतेची खात्री करुन घेतली आहे. मे. एन.पी.बिजिंग या कंपनीच्या अधिका-यांशी चर्चेच्या अनेक फे-या झाल्या असून त्यांनी सामंजस्य कराराचा मसुदा मान्यतेसाठी प्राधिकरणाकडे पाठविला आहे. त्यानुसार प्रस्तावित कामांचे तांत्रिक व आर्थिक सुसाध्यता अहवाल तयार करण्यासाठी मे.एन.पी.ब्रिजिंग या कंपनीची थेट नियुक्ती करण्याची कार्यकारी समितीने अनुमती दिल्यास सामंजस्य करार अंतिम करण्याची कार्यवाही करण्यात येईल.

१६.४ त्यानंतर, महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, सदर निविदापूर्व स्तरापर्यंतचा तांत्रिक व आर्थिक सुसाध्यता अहवाल तयार करण्यासाठी प्राधिकरणाचा वाटा म्हणून म.एन.पी.ब्रिजिंग या कंपनीने ५ लक्ष युरो एवढया खर्चाची मागणी केली आहे (सेवाकर, प्राप्तीकर वगळून) सर्व करांसहीत ही रक्कम साधारणपणे ५,९३,००० युरो (अंदाजे रु.५.३४ कोटी) एवढी होईल. सन १९९९ मध्ये मुंबईतील राजीव गांधी सी-लिंकचा उपरोल्लेखित अहवाल खुल्या निविदा मागवून तयार करण्यात आला होता. त्या अहवालाच्या अनुषंगाने प्रस्तावित खाडी पुलासाठी वरील प्रमाणे अहवाल तयार करण्यासाठी ज्या बाबी आवश्यक आहेत त्यासाठी रु. ६.१३ कोटी एवढा खर्च आला होता. दरवर्षी ५% दरवाढ लक्षात घेता हा खर्च आजमितीस रु. ११.५० कोटी एवढा होईल. सदर खर्च हा १० लाख युरो पेक्षा जास्त आहे.

१६.५ महानगर आयुक्त यांनी पुढे असेही सांगितले की, सदर सुसाध्यता अहवाल तयार करण्यासाठी श्री. ख्रिस पॉलीसेन, एन.पी.ब्रिजिंग यांनी दिनांक ३० सप्टेंबर, २०१३ च्या पत्रान्वये सामंज्यस करार सादर केला आहे. या कंपनीने दोन्ही पुलांबाबत अपेक्षित अहवाल १३ महिन्यांच्या कालावधीत पूर्ण करण्याची हमी दिली असून फी मधील प्राधिकरणाचा वाटा टप्याटप्याने प्रदान करावा असे नमूद केले आहे. सदर सुसाध्यता अहवाल तयार करण्याचे काम मे. एन.पी.ब्रिजिंग या आंतरराष्ट्रीय सल्लागार कंपनीकडून करुन घेतल्यास आंतरराष्ट्रीय दर्जाची संकल्पचित्रे तयार करणे व त्याप्रमाणे पुलाचे बांधकाम करणे शक्य होईल. तसेच फ्लँडर इन्व्हेस्टमेंट अँण्ड ट्रेड कंपनी ५०%

खर्चाचा वाटा उचलणार असल्यामुळे तांत्रिक व आर्थिक सुसाध्यता अहवाल तयार करण्याचे काम मे. एन.पी.ब्रिजिंग या बेल्जियम कंपनीस देण्यात यावे. याशिवाय प्रस्तावित दोन्ही खाडी पुलांसाठी कराव्या लागणा-या भूस्तर परिक्षण व चाचण्या (Geo-technical investigation) यासाठी अंदाजे रु. २.०० कोटी एवढा खर्च अपेक्षित आहे.

१६.६ त्यानंतर, बाब टिप्पणीतील प्रस्तावास मान्यता देऊन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :-

**ठराव क्र. १२४४:**

**"असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४च्या कलम ७ चे उपकलम (३) चे पोटकलम (तीन) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन कार्यकारी समिती याव्दारे घाटकोपर - कोपरखैरणे व रेवस - करंजा दरम्यान जोडरस्त्यासह खाडीपुलांचे बांधकाम करण्यासाठी निविदापूर्व स्तरापर्यंत तांत्रिक व आर्थिक सुसाध्यता अहवाल तयार करण्यासाठी फ्लँडर इन्व्हेस्टमेंट अँण्ड ट्रेड कंपनीने निर्देशित केलेल्या मे.एन.पी.ब्रिजिंग यांना प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणून नियुक्ती करण्यासाठी मंजूरी देण्यात येत आहे.

**"असाही ठराव करण्यात येत आहे की,** घाटकोपर - कोपरखैरणे व रेवस - करंजा दरम्यान जोडरस्त्यासह खाडीपुल बांधण्यासाठी निविदापूर्व स्तरापर्यंत तांत्रिक व आर्थिक सुसाध्यता अहवाल तयार करण्यासाठी बेल्जियम कंपनी, मे.एन.पी.ब्रिजिंग यांना टप्याटप्याने प्रदान करावयाच्या ५,९३,००० युरो (अंदाजे रु.५.३४ कोटी) इतक्या खर्चास प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**"आणखी असा ठराव करण्यात येत आहे की,** वरील दोन्ही कामांमध्ये आवश्यक भूस्तर परिक्षण व चाचण्या करण्यासाठी रु.२ कोटी इतक्या खर्चास प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**"आणखी असाही ठराव करण्यात येत आहे की,** प्रकल्पाच्या अंमलबजावणीसाठी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**बाब क्र.१७ : <u>श्रीमती रोहिणी रविंद्र तोडणकर यांची प्राधिकरणाच्या सेवेत शिपाई पदावर कायमस्वरुपी नेमणूक करणेबाबत.</u>**

१७.१ सदर विषयावर चर्चा करताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणातील वाहनचालक श्री. रविंद्र शांताराम तोडणकर हे सर जे. जे. रुग्णालय स्टँडींग मेडीकल बोर्ड, मुंबई यांच्या प्रमाणपत्रानुसार प्राधिकरणामध्ये कोणतेही काम करण्यास कायमचे असमर्थ असल्याने त्यांनी स्वेच्छानिवृत्ती अर्ज सादर केला. त्यानुसार, प्राधिकरणाने त्यांना सेवानिवृत्त केले. श्री. तोडणकर यांनी त्यांच्या पत्नी श्रीमती रोहिणी तोडणकर यांना शिपाई या पदावर कायमस्वरुपी नेमणूक करावी अशी विनंती अर्जाव्दारे केली.

१७.२ सदर विषयावर चर्चा करताना मा. मुख्य सचिव व अध्यक्ष, कार्यकारी समिती यांनी असे सांगितले की, महाराष्ट्र शासनाने दिनांक २२ ऑगस्ट, २००५ रोजी निर्गमित केलेल्या शासन निर्णयामधील २(१)चे उल्लंघन करता येणार नाही.

१७.३ श्री. द .म. सुकथनकर, सदस्य, कार्यकारी समिती यांनी असे सांगितले की, श्री. तोडणकर यांना सहा महिन्यांपूर्वीच सेवानिवृत्त करण्यात आले आहे.

१७.४ यावर महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, महाराष्ट्र शासनाने यासंदर्भात विविध शासन निर्णय निर्गमित केलेले आहेत त्या शासन निर्णयाची तपासणी करुन योग्य तो निर्णय घेण्यात येईल.

**बाब क्र.१८ : <u>श्री. एन व्ही. मिराणी, सदस्य कार्यकारी समिती यांनी सादर केलेली कार्यकारी समितीच्या कामकाजासंबंधी मुद्देसुद टिप्पणी व त्यावरील प्राधिकरणाचे शेरे/अभिप्राय.</u>**

सदर विषयावर चर्चा करताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, श्री. ना.वि.मिराणी, सदस्य, कार्यकारी समिती यांचा मुद्दा क्र. १.२ बाबत प्राधिकरणातर्फे राबविण्यात येणा-या प्रकल्पांना कार्यकारी समितीचा प्रथमःत सल्ला घेण्यात यावा व त्यानंतर प्रकल्पाच्या कामात सुरुवात करण्यात यावी.

महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, यापुढे प्रकल्पासंबंधी प्राधिकरणाची मंजूरी घेण्यापूर्वी संबंधीत विषय कार्यकारी समितीच्या बैठकीसमोर शिफारशीसाठी / माहितीसाठी सादर करण्यात येईल.

त्यानंतर, मुद्दा क्र. २.४ बाबत विहित कालावधीमध्ये दोष निवारक कार्य हाती घेण्याकरीता तसेच बांधकाम चालू असलेल्या ठिकाणी पाहणी करण्याकरिता वरिष्ठ बांधकाम सुरक्षा अभियंत्याची नेमणूक करण्यात यावी. वेळेवर सुधारणांचे काम हाती घेण्यात यावे आणि त्यांनी असुरक्षित पध्दतीचा कारभार वेळेवर कसा सुरक्षित करण्यात येईल याबाबतचा कार्यवाही अहवाल सादर करावा. त्यांच्या कर्तव्यामध्ये तात्पुरत्या कामाकरीता आणि वाहतुकीच्या अडथळयावर सुरक्षितता ठेवणे यांचाही समावेश असावा.

त्यानंतर मुद्दा क्र. २.१६ बाबत विविध प्रकल्पांचे तिमाही प्रकल्प अहवाल आणि सद्यस्थितीचे दर्शविणारा अहवाल सादरीकरणाच्या स्वरुपात कार्यकारी समितीपुढे माहितीसाठी सादर करण्यात यावा. त्यामध्ये प्रगतीचा दर, अपघात आणि इतर महत्वाच्या घटनांचा समावेश करावा.

**बाब क्र.१९ : मुंबई महानगर प्रदेशात प्राधिकरणातर्फे उभारण्यात येणा-या तळोजा येथील प्रादेशिक एकात्मिक घन कचरा व्यवस्थापन प्रकल्पास स्थानिक स्वराज्य संस्थासाठी प्राधिकरणातर्फे अर्थ सहाय्य देण्याबाबत.**

१९.१ या प्रस्तावाबाबत माहिती देताना महानगर आयुक्तांनी असे सांगितले की, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने तळोजा येथील नागरी घन कचरा व्यवस्थापन प्रकल्पात सहभागी होणा-या ६ महानगरपालिका/नगरपरिषदांपैकी, २ नगरपरिषदांनी त्यांच्या सर्वसाधारण सभेची मान्यता घेवून प्राधिकरणास सहभागी होण्याबाबत कळविले आहे तर ३ महानगरपालिकांनी आपली आर्थिक स्थिती कमकुवत असल्याचे दर्शवून सहभागी न होण्याची भूमिका घेतली व प्रस्ताव संमत केले नाहीत असे प्राधिकरणास कळविले आहे. ठाणे महानगरपालिकेने सहभागाबाबत अदयापपर्यंत काहीच कळविलेले नाही. या प्रकल्पासाठी सर्व ६ स्थानिक स्वराज्य संस्थांचा सहभाग असणे अत्यंत आवश्यक आहे. असेही महानगर आयुक्त यांनी नमूद केले.

१९.२ प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे तळोजा प्रकल्पासाठी प्राप्त "टिपींग फी" ही रास्त व वाजवी असली तरी, हा दर स्थानिक स्वराज्य संस्थांना जास्त वाटतो. परंतू प्राधिकरणाच्या प्रकल्पात "टिपींग फी" मध्ये दोन घटक असून "अस्थिर घटक" (Variable Cost) रु. ३४२ प्रति मे. टन व त्यावर प्रती वर्षी WPI वर आधारित वाढीव रक्कमेनुसार आहे व "स्थिर घटक" रु. ५०४ प्रति मे. टन हा २५ वर्षाच्या कालावधीसाठी स्थिर आहे व त्यामध्ये बदल होणार नाही. म्हणून घनकच-याच्या प्रमाणात येणारा "स्थिर घटकाचा" अंदाजे रु. ३३ कोटी प्रती वर्षी महानगर क्षेत्रात पायाभूत सुविधा पुरविणे ही प्राधिकरणाची जबाबदारी असल्याने स्थानिक स्वराज्य संस्थांना अन्य पायाभूत सुविधांच्याा धर्तीवर या नाविन्यपूर्ण व पर्यावरणाचे सर्व निकष काटेकोरपणे पाळण्यात येणा-या प्रकल्पात सहभागी होण्यास प्रोत्साहन देण्यासाठी व उत्तेजनार्थ आर्थिक पाठबळ देण्याबाबतचा प्रस्ताव सादर करण्यात आलेला

आहे. तर "अस्थिर घटकाचा" भार स्थानिक स्वराज्य संस्थांनी उचलावयाचा आहे.

१९.२ त्यावर, मा. मुख्य सचिव व अध्यक्ष, कार्यकारी समिती यांनी दिर्घ कालावधीसाठी प्रती वर्षी येणा-या आवर्ती खर्चाचा (Recurring Cost) भार प्राधिकरणाने घेऊ नये असे मत व्यक्त केले. त्यावर अति. महानगर आयुक्त (२) यांनी असे विषद केले की, "टिपींग फी" मधील "स्थिर घटक" हा प्रकल्पातील भांडवली खर्चाचा (Capital Cost) भाग असून त्याच्या रक्कमेवर प्रती वर्षी कोणतीही वाढ होणार नाही व प्रकल्प उभारणीसाठीचा २ वर्षाचा कालावधी वगळून २३ वर्षासाठी रु. ३३ कोटी प्रती वर्षी येणारी रक्कम "स्थिर" आहे. म्हणून हा प्रकल्पाच्या भांडवली खर्चाचा भाग समजण्यात यावा.

१९.३ श्री. द. म. सुकथनकर, सदस्य, कार्यकारी समिती यांनी असे सुचित केले की, नागरी घनकच-याची शास्त्रोक्त पध्दतीने विल्हेवाट लावणे ही जबाबदारी स्थानिक स्वराज्य संस्थांची असून, त्यांनी हा आर्थिक भार उचलणे अपेक्षित आहे. तर असे आर्थिक पाठबळ प्राधिकरणाने दिल्यास मुंबई महानगर क्षेत्राच्या बाहेरील स्थानिक स्वराज्य संस्था शासनाकडे मागणी करण्याची शक्यता नाकारता येणार नाही. तसेच हे अर्थसहाय्य पूर्णपणे २३ वर्षाच्या कालावधीसाठी न देता काही कालावधीसाठी देणे उचित होईल, असे मत व्यक्त केले. त्यावर कार्यकारी समितीचे सदस्य श्री. संजय भाटिया, व्यवस्थापकीय संचालक, सिडको यांनी सिडकोस असे अर्थ सहाय्य प्राप्त होणार का? असा प्रश्न उपस्थित केला. त्यावर असे अर्थ सहाय्य पाठबळ केवळ स्थानिक स्वराज्य संस्थांना लागू होईल असा खुलासा करण्यात आला.

१९.४ त्यानंतर, मा. मुख्य सचिव व अध्यक्ष, कार्यकारी समिती यांनी प्रधान सचिव, नगर विकास विभाग (२) व अन्य सदस्य या प्रस्तावाच्यावेळी उपस्थित नसल्याने व वेळेअभावी या प्रस्तावावर सविस्तर चर्चा झाली नसल्याने हा प्रस्ताव कार्यकारी समितीच्या पुढील बैठकीत सादर करावा असे निर्देश दिले.

**पटल बाब क्र.१ : दिनांक ३० सप्टेंबर, २०१३ रोजी संपणा-या त्रैमासिक कालावधीचे लेखे.**

महानगर आयुक्त यांनी प्राधिकरणाच्या दिनांक ३० सप्टेंबर, २०१३ रोजी संपणा-या त्रैमासिक लेख्यांबाबत संक्षिप्त माहिती दिली. त्यानंतर, प्राधिकरणाच्या त्रैमासिक लेख्यांची नोंद घेऊन कार्यकारी समितीने मान्यता दिली.

त्यानंतर, अध्यक्षांचे आभार मानून बैठकीचे कामकाज समाप्त करण्यात आले.

-------------xox-------------